अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १९६ । बुधवार २९ एप्रिल २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com



‘सहजयोग’
भाग ४१

## मानवी जीवनाचे प्रयोजन आणि सहजयोग

मानवाने हा विचार करायला हवा की परमात्म्याने आपल्याला का निर्माण केले? आपल्या जीवनाचे काही ध्येय आहे की उगाचच परमात्म्याने आपल्याला अमिबापासून मनुष्यापर्यंत विकसित केले आहे? जर यामागे काही कारण असेल, तर त्याचा शोध घेणे मनुष्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. जेव्हा तो हे शोधू शकत नाही किंवा ते जाणून घेऊ शकत नाही, तेव्हा त्याचे अस्वस्थ होणे अगदी स्वाभाविक आहे. सहजयोग हे या सर्व प्रश्नांचे उत्तर आहे. ’सह’ म्हणजे सोबत आणि ’ज’ म्हणजे जन्मलेला. जो परमात्म्याशी एकरूप होण्याचा अधिकार तुमच्यासोबतच जन्मला आहे, त्यालाच ’सहजयोग’ म्हणतात.आजचा सहजयोग मनुष्याला त्याच्या जीवनाचा खरा अर्थ सांगण्यासाठी आहे; हे त्याचे अंतिम शिखर आणि अंतिम ध्येय आहे. याचा शोध घेताना आपल्या भारतवर्षात आदिकाळापासून अनेक ऋषी-मुनींनी मनन आणि ध्यानाद्वारे अंतर्यामी अनेक गोष्टींचा शोध लावला. परशुरामांच्या काळात लोकांनी जंगलात जाऊन शोध घेण्याचा प्रयत्न केला. जगाशी संबंध तोडून, कठोर ब्रह्मचर्याचे पालन करून आणि छोट्या गुहेत लपून त्यांनी अनेक वर्षे तपस्या केली. त्यानंतर त्यांनी मनुष्याच्या आतील सूक्ष्मातिसूक्ष्म आणि गुप्त रहस्यांचा शोध लावला.परंतु, त्यांच्या या संशोधनाचा लाभ खूप कमी लोक घेऊ शकले, कारण हे कार्य अत्यंत सूक्ष्म होते आणि समाजात राहून ते करणे खूप कठीण होते.

०३ फेब्रुवारी १९७७ मुंबई अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## देवेंद्र फडणवीसांनी ’शब्द’ पाळला...

# विवेक कोल्हे यांना भाजपची उमेदवारी जाहीर!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर/मुंबई :** राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिलेल्या विधान परिषद निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने आपल्या ५ उमेदवारांच्या नावांची अधिकृत घोषणा केली आहे. यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्याचे तरुण नेतृत्व विवेक कोल्हे यांना संधी देऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीत दिलेला शब्द पूर्ण केला आहे. कोल्हे यांच्यासह सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे आणि प्रमोद जठार यांच्या नावावर भाजपच्या संसदीय समितीने शिक्कामोर्तब केले आहे.

भाजपने जाहीर केलेल्या यादीत प्रादेशिक समतोल राखण्याचा प्रयत्न केला आहे. अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात कोपरगावचा काळे-कोल्हे संघर्ष सर्वश्रुत आहे. मागील विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या जागावाटपात कोपरगावची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट)



गेल्यानंतर, भाजपने विवेक कोल्हे यांना महायुतीचा धर्म पाळण्याचे आदेश दिले होते. आपल्या कट्टर राजकीय विरोधकाचा म्हणजेच आमदार आशुतोष काळे यांचा प्रचार करण्याचे कठीण आव्हान कोल्हे यांनी स्वीकारले होते. त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हे यांना विधान परिषदेचा शब्द दिला होता. काल रात्रीच विवेक कोल्हे यांनी मुंबईत फडणवीस यांची भेट घेतली होती, तर त्यापूर्वी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचीही त्यांनी भेट घेतली होती. या भेटीगाठींनंतर अखेर आज त्यांच्या उमेदवारीवर अधिकृत शिक्कामोर्तब झाले. ज्येष्ठ नेते शंकरराव कोल्हे यांचा वारसा आणि माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचे चिरंजीव असलेल्या विवेक कोल्हे यांना मिळालेली ही संधी जिल्ह्याच्या राजकारणात भाजपची पकड अधिक मजबूत करणारी ठरणार आहे.

### विधान परिषदेची उमेदवारी निश्चित झालेले नेते

प्रमोद जठार: सिंधुदुर्गचे खंदे नेतृत्व असलेल्या जठार यांना संधी देऊन भाजपने कोकणावरील अन्यायाची भावना दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. संजय भेंडे: नागपूर भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष आणि नितीन गडकरींचे खंदे समर्थक असलेल्या भेंडे यांच्या निष्ठेचा सन्मान करण्यात आला आहे. ते सध्या प्रदेश उपाध्यक्ष असून सहकार क्षेत्रातही त्यांचा मोठा दबदबा आहे. **(पान ४ वर)**

### कोपरगावात जल्लोष

**विवेक कोल्हे यांचे नाव जाहीर होताच कोपरगाव तालुक्यासह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोष केला. पक्षनिष्ठेचे फळ उशिरा का होईना पण मिळते, हे या उमेदवारीतून स्पष्ट झाले आहे. आता या पाचही उमेदवारांच्या निवडीमुळे विधान परिषदेत भाजपची ताकद आणखी वाढणार आहे.**

# लातूर जिल्ह्यात उष्माघाताचा चौथा बळी



### ७५ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू; अकोल्यात सर्वाधिक ४७ अंश तापमान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लातूर :** यंदाच्या उन्हाळ्यातही एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कडक उन्हाचा कहर जाणवत असून विदर्भ आणि मराठवाड्यात तापमान चांगलंच वाढलं आहे. उष्माघातामुळे काही ठिकाणी मृत्यू झाल्याच्याही घटना समोर आल्या आहेत. लातूर जिल्ह्यातही मे महिन्याच्या सुरुवातीआधीच उष्माघाताच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत असून आज आणखी एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथे ७५ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू झाला असून उष्माघाताने त्यांचा मृत्यू झाल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे जिल्ह्यात उष्माघातामुळे मृतांचा आकडा आता चारवर पोहोचला आहे.

**■ औराद शहाजानी भागात हवामान केंद्रावर ४३ अंश सेल्सिअस पर्यंत तापमानाची नोंद झाली आहे. तीव्र उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी वर्ग यांना विशेष धोका निर्माण झाला आहे.**

मृत शेतकऱ्याचे नाव त्र्यंबक नारायण बेळंबे असे असून दुपारी साडेबारा ते एकच्या सुमारास ते स्वतःच्या शेतात जनावरांसाठी चारा कापत असताना अचानक त्यांना चक्कर आली आणि ते खाली कोसळले. त्यांना तात्काळ पानचिंचोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. यापूर्वी जिल्ह्यात उष्माघातामुळे मृत्यू झाल्याच्या तीन घटना समोर आल्या होत्या.

औसा तालुक्यातील एरंडी गावात २५ वर्षीय महेश लिंबाजी इंगोले या तरुणाचा शेतातील कामावरून घरी आल्यानंतर चक्कर येऊन मृत्यू झाला होता. तर, औसा तालुक्यातील गोंद्री येथे नऊ महिन्यांच्या बाळाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. आणखी एका घटनेत औराद शहाजनी येथे ६० वर्षीय शेतकऱ्याचाही प्रखर उन्हामुळे मृत्यू झाला होता. गेल्या काही दिवसांपासून लातूर जिल्ह्यात तापमानात सातत्याने वाढ होत असून दुपारच्या सुमारास तापमान ४० ते ४१ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत आहे. दरम्यान, प्रशासन आणि आरोग्य विभागाकडून नागरिकांना अत्यावश्यक कामांशिवाय दुपारच्या कडक उन्हात बाहेर पडू नये, पुरेसे पाणी प्यावे, हलके व सैल कपडे परिधान करावेत आणि लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. विदर्भात राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली असून अकोल्यात तापमान ४७ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचल्याची नोंद आहे. अमरावतीमध्ये ४५.२ तर वर्ध्यात ४५.० अंश तापमानाची नोंद झाली आहे.

## महत्त्वाचे..

### उष्माघाताचा अकोलेत पहिला बळी

अकोले : तालुक्यातील कळस येथील एका ४५ वर्षीय शेतकऱ्याचा उष्माघातसदृश आजाराने मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि.२६) दुपारी तीन वाजेच्या सुमारास संगमनेर येथे घडली.



उष्माघाताचा अकोलेतील हा पहिला बळी ठरला आहे. दिगंबर जनार्दन वाकचौरे असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

गेल्या काही दिवसांपासून अकोले व संगमनेर तालुके तीव्र उन्हामुळे भाजून निघत आहेत. सुमारे ४१ अंश सेल्सिअसपेक्षा पुढे तापमान जात आहे. दिगंबर वाकचौरे भर उन्हात कळसहून मोटारसायकलवर संगमनेर येथे गेले होते. तेथील पानसरे हॉस्पिटल येथे त्यांची बहीण उपचार घेत आहे. ते तिला भेटण्यासाठी गेलेले असताना उन्हाचा त्रास झाला. त्रास होऊ लागल्यामुळे डॉ. पानसरे यांच्या हॉस्पिटलसमोरील हॉटेलमधून त्यांनी पिण्यासाठी थंड पाण्याची बाटली विकत घेतली व उकाडा अधिक जाणवत असल्याने व त्रास होत असल्याने त्यांनी पाणी बाटली डोक्यावर ओतली. परंतु त्यांना चक्कर येऊन तेथेच जमिनीवर कोसळून त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

# भोंदू गणेशबाबाला पाच दिवस पोलीस कोठडी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** पोटात दुखते म्हणून प्रसाद म्हणुन खडीसाखर, पेढा उदी मिक्स करुन महिलेस खाण्यास देऊन बेशुद्ध करून तिला फसवून पिडित महिलेच्या इच्छेविरुद्ध वेळोवेळी शारिरीक संबंध ठेवल्याप्रकरणी तालुक्यातील बेलापूर येथील अनेक दिवसापासून पसार असलेल्या भोंदू गणेश बाबाला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ५ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश प्रथम वर्ग न्यायाधीश जाधो यांनी दिले.

याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात पिडीत महिलेने फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी गणेश माधव शिंदे उर्फ गणेश महाराज याचेविरुद्ध बलत्कार व जादुटोणा प्रतिबंधक अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपी भोंदू गणेश महाराज यास अटक करण्यात आल्यानंतर भोंदू गणेश बाबाने गुन्ह्याची पोलिसांकडे कबुली दिली. पोलिसांनी काल या भोंदू गणेश बाबाला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने २ मे पर्यंत म्हणजे ५ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. सरकार पक्षाच्यावतीने सरकारी वकील एस. आर. माढेकर यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. आरिफ शेख व ॲड. जावेद शेख यांनी काम पाहिले.अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस निरीक्षक नितीन देशमुख करत असून या भोंदू बाबाचे राजकीय कनेक्शन आणि अन्य पीडित महिलाबाबत पोलिस माहिती गोळा करत आहे. तसेच संभाजीनगर येथील परिचीत व्यक्तीकडे सुरू असलेल्या भिशीच्या पैशाच्या वादातील आर्थिक माहिती पोलीस घेत आहे.

# ज्येष्ठ नेते दिलीपराव लांडे यांचे निधन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव (प्रतिनिधी) :** तालुक्यातील ज्येष्ठ नेते दिलीपराव नरसिंगराव लांडे (वय ६९) यांचे मंगळवारी पहाटे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने शेवगाव तालुक्यात शोककळा पसरली असून विविध क्षेत्रांतून हळहळ व्यक्त होत आहे.



लांडे पाटील यांनी राजकीय, सामाजिक, सहकार तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. जायकवाडी धरण परिसरातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने लढा देत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी उभारलेल्या आंदोलनात सहभागी झाल्यामुळे त्यांना कारावासही भोगावा लागला होता.

ते शेवगाव ग्राम पंचायतीचे सरपंच, ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक, तालुका दूध संघाचे चेअरमन, शेवगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, पंचायत समितीचे सभापती तसेच जिल्हा परिषदेत पशुसंवर्धन विभागाचे सभापती म्हणून विविध पदांवर कार्यरत होते. त्यांच्या कार्यकाळात अनेक विकासकामांना गती मिळाली. प्रभावी वक्तृत्व, ठाम भूमिका आणि व्यापक जनसंपर्क यामुळे त्यांनी जनमानसात वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनामुळे शेवगाव तालुक्यासह जिल्ह्याच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

मंगळवारी सायंकाळी उशिरा त्यांच्या मूळ गावी जोहरापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# सासूच्या अंत्यविधीसाठी आलेल्या जावयाची दगडाने ठेचून हत्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जालना :** सासूच्या अंत्यविधीसाठी आलेल्या एका ५५ वर्षीय व्यक्तीची अज्ञात व्यक्तींनी दगडाने ठेचून निर्घृण हत्या केली. ही घटना जालना तालुक्यातील गोंदेगाव शिवारात सोमवार दि. २७ रोजी उघडकीस आली. या हत्याकांडामुळे परिसरात भीतीचे आणि दहशतीचे वातावरण पसरले आहे. मच्छिंद्र दराडे (५५, रा. पानेगाव) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दराडे हे आपल्या नातेवाईकाकडे (सासूच्या) अंत्यविधीसाठी गोंदेगाव येथे आले होते. मात्र, काळाला काही वेगळेच मान्य होते. सासूला अखेरचा निरोप देण्यासाठी आलेल्या दराडे यांचाच अज्ञात हल्लेखोरांनी दगडाने ठेचून जीव घेतला. हल्लेखोरांनी दराडे यांना गाठून त्यांच्यावर दगडाने भीषण प्रहार केले. हा हल्ला इतका भयानक होता की, मच्छिंद्र दराडे यांचा जागीच मृत्यू झाला.

आज सकाळी गोंदेगाव शिवारात रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह पडल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. या घटनेची माहिती मिळताच जालना तालुका पोलिस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी जालना शासकीय रुग्णालयात पाठवला आहे. तसेच घटनास्थळाचा पंचनामा करून पुराव्यांची जमवाजमव सुरू केली आहे. मच्छिंद्र दराडे यांची हत्या पूर्ववैमनस्यातून करण्यात आली की काय याचा शोध पोलिस घेत आहे. पोलिसांनी आरोपींच्या शोधासाठी विविध पथके तैनात केली आहेत. अंत्यविधीच्या दुःखात असतानाच पाहुण्या जावयाची अशी हत्या झाल्याने दोन्ही गावांवर शोककळा पसरली आहे. मृत मच्छिंद्र दराडे यांचा मुलगा पवन मच्छिंद्र दराडे यांच्या फिर्यादीवरून तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आईवरून शिविगाळ केली म्हणून हा खून झाला असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. घटनास्थळी दारुच्या बाटल्या, दुचाकी आढळून आली आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आहे.

# अरणगावत पोटच्या मुलाने केली बापाची हत्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** तालुक्यातील अरणगाव येथे शेजाऱ्यांना शिवीगाळ करण्यास मज्जाव केल्याच्या रागातून झालेल्या वादात मुलानेच वडिलांची कोयता व काठीने मारहाण करून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे जामखेड तालुक्यात एकच खळबळ उडाली असून आरोपी मुलाविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी (दि. २६ एप्रिल) सायंकाळी पाचच्या सुमारास रावसाहेब उर्फ बबन विठ्ठल सोनवणे (वय ६८, रा. अरणगाव) हे शेजाऱ्यांना शिवीगाळ करीत होते. यावेळी त्यांचा मुलगा अशोक रावसाहेब सोनवणे (वय २४) याने वडिलांना शेजाऱ्यांना शिवीगाळ करू नका, असे सांगितले.याचा राग आल्याने रावसाहेब सोनवणे यांनी स्वतःच्या मुलावर कोयत्याने हल्ला करण्यास सुरुवात केली. त्यावेळी अशोक याने वडिलांच्या हातातील कोयता हिसकावून घेतला व त्याच कोयत्याने तसेच जवळील काठीने त्यांच्या पाठीवर व पोटावर मारहाण केली. या मारहाणीत रावसाहेब सोनवणे गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडले.त्यांना तातडीने जामखेड येथील खासगी रुग्णालयात नेण्यात आले. त्यानंतर ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सुरुवातीला अकस्मात **(पान ४ वर)**

# उत्तरप्रदेशच्या धर्तीवर राज्यातही खते लीकिंग बंद करणार : कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** ज्या कंपन्यांकडून अनुदानित खते विक्रीचा अधिकार देण्यात आलेला आहे. त्यांना विनाअनुदानित खते व कृषी निविष्ठा विक्री करता येणार नाही, अशा स्वरुपाचा निर्णय उत्तर प्रदेशात झाला आहे.

तसेच रासायनिक खतांचा पुरवठा करताना होणारे लीकिंग बंद करणेबाबत उत्तरप्रदेशने जाहीर केलेल्या आदेशाच्या धर्तीवर राज्यात देखील निर्णय घेतला जाईल, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. तसेच राज्यातील कृषि निविष्ठा विक्री व्यवसायिकांच्या विविध प्रश्नांवर घेतलेल्या भूमिकेमुळे २७ एप्रिलपासून सुरू असलेला संप शेतकऱ्यांच्या हितासाठी मागे घेण्याबाबत या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असून संप मिटण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



मंत्रालय परिषद सभागृह येथे कृषि निविष्ठा विक्री व्यवसायातील अडचणीबाबत माफदा संघटनेचे प्रतिनिधींसमवेत झालेल्या बैठकीत कृषि मंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार राजेश बकाने, ऑनलाईन कृषि विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषि आयुक्त सुरज मांढरे, कृषि संचालक सुनिल बोरकर, माफदा संघटनेचे विनोद तराळ पाटील, ऑल इंडियाचे अध्यक्ष मनमोहन कलंतरे यासह संघटनेचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, उत्तरप्रदेशमध्ये ज्या खत उत्पादक कंपन्या स्वतः तयार केलेले खत विकतात, त्याच प्रकारचा कायदा महाराष्ट्रातही लागू केला जाणार आहे. शेजारील राज्यातून येणाऱ्या अप्रमाणित एचटीबीटी कपाशी बियाण्याविरुद्ध कडक कारवाई करण्यासाठी केंद्राला प्रस्ताव दिला जाईल, **(पान ४ वर)**

### राज्याचा स्वतंत्र बियाणे कायदा करणार

**शेतकऱ्यांना स्वतःचे बियाणे साठवणे, वापरणे, देवाणघेवाण करणे आणि (ब्रँडेड नाव न वापरता) विक्री करण्यास कायदेशीर संरक्षण, शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावेत, त्यांना कायदेशीर संरक्षण मिळावे तसेच बियाणे खराब निघाल्यास त्याची नुकसानभरपाई तात्काळ मिळावी, यासाठी राज्याचा सर्व शिफारशींसह स्वतंत्र बियाणे कायदा करणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.**

॥ जाहीर ऋणनिर्देश ॥

शुभविवाह संपन्न

चि.सौ.का. नम्रता (पुणतांबा) व चि. शुभम (वाकडी)

आमची कन्या चि.सौ.का. नम्रता व वाकडी येथील सौ. कल्याणी व श्री. विजय दादासाहेब पाटील शेळके यांचे चिरंजीव चि. शुभम यांचा शुभविवाह सोहळा आपल्या सर्वांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

या मंगल प्रसंगी रयत शिक्षण संस्था व खाजगी संस्थांचे प्राचार्य, प्राध्यापक, सेवक, नामवंत उद्योजक, श्रीरामपूर, राहता व कोपरगाव बार असोसिएशनचे अध्यक्ष व वकील, श्रीरामपूरचे आजी-माजी नगरसेवक, विविध ग्रामपंचायतींचे सरपंच-उपसरपंच, गणेशनगर, कोळपेवाडी व संजीवनी कारखान्याचे चेअरमन व संचालक मंडळ, वृत्तपत्र क्षेत्रातील संपादक, वार्ताहर, विविध सोसायट्यांचे पदाधिकारी, व्यापारी, शेतकरी बांधव, राजकीय पदाधिकारी, जेष्ठ नागरिक संघ आणि सर्व आप्तेष्टांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून वधू-वरांना शुभाशीर्वाद दिले. आपल्या स्नेहपूर्ण उपस्थितीमुळे लग्नाची शोभा वाढली व आमचा आनंद द्विगुणीत झाला. आपल्या या प्रेमाबद्दल व स्नेहाबद्दल आम्ही आपले ऋणी आहोत. धन्यवाद!



✲ आपले स्नेहांकित ✲
प्राचार्य प्रोफेसर डॉ. एस. आर. बखळे व परिवार, मु. पो. पुणतांबा

## संपादकीय

# उष्णतेची बेटे आणि होरपळणारी खेडी

सूर्याचा प्रकोप आता केवळ निसर्गाचा कोप राहिला नसून, तो मानवी हव्यास आणि हवामान बदलाच्या चुकांचा दाहक परिपाक आहे. जर आताच सावध होऊन कृती केली नाही, तर 'उष्णतेची बेटे' बनलेली शहरे आणि होरपळणारी खेडी भविष्यातील महासंकटाची नांदी ठरतील.

सध्या संपूर्ण देश आणि विशेषतः आपला महाराष्ट्र उन्हाच्या तीव्र झळांनी होरपळून निघत आहे. विदर्भापासून ते खान्देशपर्यंत आणि मराठवाड्यापासून ते पश्चिम महाराष्ट्रापर्यंत तापमानाने ४२ ते ४७ अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला आहे. अकोल्यासारख्या शहरात ४६.९ अंशांची नोंद होणे, हे केवळ हवामान खात्याचे आकडे नाहीत; तर ते निसर्गाकडून मिळणारे धोक्याचे इशारे आहेत. सूर्याचे हे 'आग ओकणे' मानवी आरोग्यापासून ते शेती अर्थव्यवस्थेपर्यंत सर्वच क्षेत्रांना पोळून काढत आहे. पण या भीषण उष्णतेमागील कारणांचा शोध घेतला, तर या पापाचे धनी कोण आहेत, हे स्पष्टपणे समोर येते.

जागतिक तापमानात झालेली ही वाढ कार्बन उत्सर्जनाचा परिणाम आहे. खरे तर, कार्बन उत्सर्जित करून पृथ्वीचे तापमान वाढवण्याचे सर्वाधिक काम विकसित राष्ट्रांनी, विशेषतः अमेरिकेसारख्या देशांनी केले आहे. दरडोई ऊर्जावापर जास्त असलेले हे देश आजही आपली जबाबदारी स्वीकारायला तयार नाहीत. या श्रीमंत राष्ट्रांच्या प्रदूषणामुळे आज भारत, आफ्रिकी देश आणि इतर विकसनशील राष्ट्रांना सर्वाधिक फटका सोसावा लागतो आहे. जेव्हा जेव्हा पर्यावरणाच्या करारांवर स्वाक्षरी करण्याची वेळ येते, तेव्हा हे विकसित देश हात झटकतात. मात्र, त्याचा परिणाम आज आपल्याकडील शेतकरी, कष्टकरी आणि वन्यजीवांना भोगावा लागत आहे.

आज आपली मोठी शहरे काँक्रीटची जंगले झाली आहेत. झाडांची बेसुमार कत्तल आणि सिमेंटच्या रस्ते-इमारतींमुळे शहरे 'उष्णतेची बेटे' बनली आहेत. रात्रीच्या वेळीही ही शहरे थंड होत नाहीत. चिंतेची बाब अशी की, नागरीकरणाच्या वाटेवर धावणारी आपली खेडीही आता याच मार्गावर आहेत. गावागावांत असलेली झाडे कमी झाली असून तिथेही सिमेंटची बांधकामे वाढली आहेत. यामुळे खेड्यांची अवस्था 'आगीतून आणखी आगीत' अशी झाली आहे. विदर्भात पारा पन्नाशीच्या जवळ पोहोचत असताना 'आकाशाच्या छताखाली' राबणाऱ्या शेतकरी आणि शेतमजुरांचे काय होणार, हा प्रश्न अंगावर काटा आणणारा आहे.

उष्णतेच्या लाटांमुळे बाष्पीभवन वाढले असून जमिनीतील ओल नष्ट होत आहे. देशातील १६६ मोठ्या जलाशयांमध्ये केवळ ४१ टक्के पाणी शिल्लक राहणे, ही चिंतेची बाब आहे. महाराष्ट्र, राजस्थान आणि झारखंडमध्ये पाणीटंचाईने उग्र रूप धारण केले आहे. शहरात टँकर तरी पोहोचतात, पण दुर्गम पाड्यांवरील आदिवासी महिलांच्या पाचवीला पुजलेली मैलोन्मैल पायपीट कोण थांबवणार? घोटभर पाण्यासाठी तहानलेल्या या जिवांच्या वेदनांकडे कोणाचे लक्ष आहे? यातच 'एल-निनो'चे सावट आणि जागतिक युद्धपरिस्थितीमुळे वाढलेली इंधन-खतांची टंचाई, यामुळे आपली शेतीव्यवस्था दुहेरी संकटात सापडली आहे.

'संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना' आणि 'जागतिक हवामान संघटना' यांनी नुकताच एक धक्कादायक अहवाल प्रसिद्ध केला आहे. अतिउष्णतेमुळे भारतीय शेतीची व्यवस्था कशी विस्कळीत होऊ शकते, याचे विश्लेषण यात दिले आहे. या अहवालानुसार, उत्तर भारतातील मैदानी प्रदेशातील शेती कामगारांची कार्यक्षमता या शतकाच्या अखेरीस ४० टक्क्यांनी कमी होऊ शकते. उष्णता आणि आर्द्रता यांच्या एकत्रित परिणामामुळे शेतात काम करणे अशक्य होईल, परिणामी मजुरांची मोठी टंचाई निर्माण होईल. उष्णतेमुळे बाष्पीभवन वाढून पिकांना पाण्याची गरज अधिक भासेल, पण दुसरीकडे सिंचनासाठी पाणीच उपलब्ध नसेल. ही 'उष्णता-दुष्काळ साखळी' भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मोडू शकते.

संकट समोर उभे असताना केवळ चर्चा करून भागणार नाही. आपल्याला युद्धपातळीवर काही उपाययोजना कराव्या लागतील. केवळ पाण्याचा वापर न करता 'पाणी जिरवणे' हाच एकमेव पर्याय आहे. प्रत्येक गावात आणि शहरात रेनवॉटर हार्वेस्टिंग अनिवार्य व्हायला हवे. उष्णता सहन करू शकणारी बियाणे विकसित करणे आणि सूक्ष्म सिंचनाचा जास्तीत जास्त वापर करणे गरजेचे आहे. उष्णतेच्या लाटांच्या वेळी शेतीकामाच्या वेळा बदलणे आणि मजुरांसाठी शेतात सावली व पाण्याची सोय करणे ही आता चैन नसून गरज आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा' हा केवळ घोषणांचा भाग न राहता ती एक सामाजिक जबाबदारी बनायला हवी. झाडेच नैसर्गिकरीत्या तापमान कमी करू शकतात. शाळांच्या वेळा बदलण्यापासून ते कामाच्या ठिकाणच्या नियोजनापर्यंत सर्वत्र उष्णतेचा विचार करून धोरणे आखावी लागतील.

उन्हाच्या या तीव्र झळा आपल्याला निसर्गाशी केलेल्या प्रतारणेची आठवण करून देत आहेत. आपण डोईवर तळपणाऱ्या सूर्याच्या प्रकाशात आपल्या ज्या चुका ठळकपणे दिसत आहेत, त्या आता तरी दुरुस्त करायला हव्या. हवामान बदलाच्या या जागतिक अरिष्टातून वाचण्यासाठी स्थानिक पातळीवर नियोजन आणि प्रामाणिक अंमलबजावणी याशिवाय दुसरा मार्ग नाही. जर आपण आज ही 'आग' विझवण्यासाठी पावले उचलली नाहीत, तर येणारा काळ अधिक दाहक आणि विनाशकारी असेल.

# श्रीरामपुरात उन्हाळी शूटिंग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**गौरव डेंगळे । राष्ट्र सह्याद्री**




**श्रीरामपूर :** बोरावके नगर परिसरातील द अल्टिमेट स्पोर्ट्स शूटिंग अकॅडमी यांच्या वतीने उन्हाळी शूटिंग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १ मे ते २० मे दरम्यान दोन टप्प्यांमध्ये हे शिबिर पार पडणार असून विद्यार्थ्यांसह मास्टर्स गटातील नागरिकांनाही सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या शिबिरामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना ऑलिंपिक शूटिंग क्रीडेची ओळख, सुरक्षा नियम, शस्त्र हाताळणी, लक्ष्य साधण्याचे तंत्र, टार्गेट शूटिंग, फिटनेस व स्ट्रेंथ ट्रेनिंग यासह विविध स्पर्धांची माहिती दिली जाणार आहे. शालेय, महाविद्यालयीन, विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील शूटिंग स्पर्धांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच शूटिंग खेळाचे करिअर व त्याचे शारीरिक-मानसिक फायदे याबाबतही माहिती देण्यात येणार आहे. शिबिराचे प्रशिक्षण राष्ट्रीय खेळाडू प्रशिक्षक केतन वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली होणार असून प्रत्येक गटामध्ये केवळ ६ खेळाडूंना प्रवेश दिला जाणार आहे.

सकाळी ८ ते १२ आणि सायंकाळी ५ ते ८ या वेळेत विविध बॅचेसचे आयोजन करण्यात आले आहे. ९ वर्षांवरील मुले-मुलींसाठी तसेच ३० ते ७० वयोगटातील मास्टर्स गटासाठीही हे शिबिर खुले आहे. अकॅडमीमार्फत शस्त्रे, टार्गेट्स आणि पेललेट्सची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. दोन्ही टप्पे पूर्ण करणाऱ्या सहभागी खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

६ जणांच्या ग्रुप बुकिंगवर विशेष सवलत देण्यात येणार असून प्रवेशासाठी ३० एप्रिलपूर्वी पूर्वनोंदणी आवश्यक आहे. मर्यादित जागांमुळे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर प्रवेश दिला जाणार आहे. हे शिबिर द अल्टिमेट स्पोर्ट शूटिंग अकॅडमी, कुंकुळोळ टफ,बोरावके नगर, श्रीरामपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी केतन वाघ, नितीन बलराज, आशिष गरुड आदींशी संपर्क साधावा.

# देवळाली प्रवरा नगरपरिषदेत जनगणनेचे विशेष प्रशिक्षण सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**राहुरी :** देवळाली प्रवरा नगरपरिषदेच्या वतीने आगामी जनगणनेच्या पार्श्वभूमीवर अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, जनगणना प्रक्रियेबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

चार्ज अधिकारी, मुख्याधिकारी ऋषिकेश पाटील आहेत. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी जनगणनेचे राष्ट्रीय महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजण्याची प्रक्रिया नसून देशाच्या विकासाचा पाया आहे. शासनाच्या विविध योजना, निधीचे नियोजन, तसेच सामाजिक व आर्थिक धोरणांची आखणी ही जनगणनेच्या अचूक आकडेवारीवर अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याने ही जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे आणि दक्षतेने पार पाडावी. त्यांनी पुढे डिजिटल पद्धतीने होणाऱ्या जनगणनेची माहिती देत तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्याचे आवाहन केले.

या प्रशिक्षणासाठी प्रकल्प अधिकारी सुनील गोसावी व माध्यमिक शिक्षक सचिन निमसे यांनी प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले. त्यांनी जनगणना प्रक्रियेतील विविध टप्पे, माहिती संकलनाच्या पद्धती, फॉर्म भरण्याचे नियम, तसेच प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडचणींवर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या सादरीकरणामुळे उपस्थितांना जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया स्पष्ट झाली.


यावेळी प्रशासकीय अधिकारी दीपक जग्रवाल यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला वसुली विभाग प्रमुख रामदास म्हस्के यांनी उपस्थितांचे स्वागत केले व प्रशिक्षणाच्या उद्देशाबद्दल थोडक्यात माहिती दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी ग्रंथपाल संभाजी वाळके यांनी आभार प्रदर्शन करत सर्व अधिकारी, प्रशिक्षक व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

या प्रशिक्षणामुळे जनगणना कार्य अधिक प्रभावी, अचूक आणि सुव्यवस्थित रितीने पार पाडण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी जनगणना विभागाचे भूषण नवाल, वैभव ठोबरे सागर होले, गौरव शेळके यांनी विशेष परिश्रम घेतले.

## भाविक व भावुक एकत्र कसे होतात, याचा अनुभव शिर्डीत आला : देवदत्त नागे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोल्हार:** प्रसिद्ध चित्रपट अभिनेते तथा जय मल्हार मालिकेतील खंडोबाची भूमिका साकारणारे देवदत्त नागे यांनी नुकतीच शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनाला भेट दिली. यावेळी शिर्डीतील वातावरणाने भारावून गेल्याचे सांगताना, भाविक आणि भावुक एकत्र कसे होतात, याचा अनुभव शिर्डीत आला, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

दैनिक राष्ट्र सह्याद्रीशी भ्रमणध्वनीवर संवाद साधताना नागे म्हणाले, मी आणि माझे मित्र शेगावहून शिर्डीत आलो. दर्शन रांगेत तासनतास उभे राहून साईनामाचा जयघोष करणारे भाविक पाहिले. साईबाबांच्या भूमीत पाऊल ठेवताच नवीन ऊर्जा मिळाल्याचा अनुभव आला.

ते पुढे म्हणाले, ज्या ठिकाणी साईबाबा बसत होते, त्या पवित्र स्थळी पोहोचताच आमच्या डोळ्यांत आपोआप अश्रू आले. श्रद्धा आणि भावनांचा संगम शिर्डीत अनुभवायला मिळाला.

दर्शन व्यवस्थेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, रांगेत उभे राहून घेतलेले दर्शनच खरे समाधान देते. रांगेतून दर्शन घेतले तर परमेश्वरापर्यंत जाता येते, वशिल्याने घेतले तर फक्त मूर्तीपर्यंत पोहोचता येते.

साईबाबांकडे काय प्रार्थना केली, असे विचारले असता ते म्हणाले, साईबाबा सर्वांचे मायबाप आहेत. सर्वांना सुखी ठेवा, सर्वांची काळजी घ्या आणि सर्वांच्या सदिच्छा पूर्ण करा, हीच प्रार्थना केली.

आगामी चित्रपटांविषयी बोलताना नागे यांनी घबाडकुंड हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होत असून देवकीनंदन वासुदेवा व रॉबिन हूड हे दोन चित्रपटही प्रेक्षकांच्या भेटीस येत असल्याची माहिती दिली. तसेच दैनिक राष्ट्र सह्याद्रीच्या वाचकांना शुभेच्छाही दिल्या.

# गणेगावात २ ते २५ मेदरम्यान वसंत बालसंस्कार शिबिराचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील आदर्श गाव गणेगाव येथे सालाबादप्रमाणे यंदाही २ ते २५ मे २०२६ या कालावधीत भव्य वसंत बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत आयोजित या शिबिरात विद्यार्थ्यांना संस्कार, अध्यात्म आणि व्यक्तिमत्त्व विकासाचा संगम अनुभवायला मिळणार आहे.

वेदांताचार्य स्वामी संजय महाराज व वेदांताचार्य स्वामी विजय महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज सकाळी ८ ते १२ या वेळेत शिबिर पार पडणार आहे. शिबिरामध्ये नमन, श्रीमद् भगवद्गीता अभ्यास, योगासने, हनुमान चालीसा पठण, इंग्रजी व्याकरण, संस्कृत प्रवेश, सुभाषित परिचय, नामजप, मृदंगवादन, खेळ, दंड, भजन तसेच टाळ-पावलांसह हरिपाठ यांसारख्या विविध उपक्रमांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

शनिवार, २ मे रोजी सकाळी ८ वाजता या शिबिराचे उद्घाटन हरेश महाराज पाटील (आळंदी) यांच्या हस्ते होणार आहे.

शिबिरादरम्यान महंत उद्धव महाराज मंडलिक, विदर्भरत्न संजय महाराज पाचपोर, महंत अर्जुन महाराज तनपुरे, लक्ष्मण महाराज देशमुख, बाळकृष्ण महाराज कांबळे, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, उद्योजक विजयकुमार सेठी, डॉ. प्रताप गिरगुणे, डॉ. दीपा कुसळकर, नामदेव महाराज शास्त्री, दीपक गायके आदी मान्यवर भेट देणार आहेत.

सोमवार, २५ मे रोजी सायंकाळी शिबिराची सांगता होणार असून, या शिबिराचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन वेदांत गुरुकुल तसेच गणेगाव ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# रहाट पाळणे ठेका थकीत रकमेबाबत टाळाटाळ, ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** रामनवमी यात्रोत्सवातील रहाटपाळण्याच्या ठेकेदाराने पालिकेचे २८ लाख रुपये थकवले आहेत. पालिकेला त्याने दिलेले धनादेश वटलेले नाहीत, तरीही पालिकेच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदाराविरुद्ध कायदेशीर कारवाईस टाळाटाळ केली. याप्रकरणी आता ठेकेदार आणि पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश नगराध्यक्ष करण ससाणे यांनी दिले आहेत. पालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंगळवारी ससाणे यांनी पालिकेचे अभियंता अभिषेक मराठे यांना सदस्यांनी धारेवर धरले.

यात्रेतील रहाटपाळण्याचा ठेका ५६ लाख रुपयांना देण्यात आला होता. यात ४० टक्के रक्कम ही करारनाम्यासोबत द्यावयाची होती. उर्वरित ३० टक्के रक्कम यात्रेच्या दोन दिवसांनंतर तर अखेरची ३० टक्के रक्कम यात्रा संपताच दोन दिवसांनी अदा करणे बंधनकारक होते. मात्र, ठेकेदाराने आजवर केवळ २८ लाख रुपये जमा केले. या प्रश्नावर पक्षप्रतोद मुजफ्फर शेख यांनी प्रशासनाला चांगलेच सुनावले. ठेकेदाराने धनादेश बँकेत वटलेले नाहीत, तरीही त्याला पाठीशी घातले जाते, याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्यामुळे संतप्त झालेल्या नगराध्यक्ष ससाणे यांनी मुख्याधिकाऱ्यांना मराठे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत.

दरम्यान, याच मुद्द्यावरून शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक आकाश बेग यांनी यात्रा काळातील अवकाळी पावसाने ठेकेदाराचा व्यवसाय बुडाल्याचे सांगितले, तसेच दैनंदिन करवसुली तसेच इतर करातील ठेकेदारांनी आजवर पालिकेचे १ कोटी ६० लाख रुपये बुडवले होते, याकडे लक्ष वेधले. मात्र, पालिका अशा कोणत्याही ठेकेदारांची गय करणार नाही, असा इशारा ससाणे यांनी दिला. पुढील वर्षापासून यात्रेतील रहाटपाळण्यातून पालिकेने व्यवसाय करू नये. किमान रकमेत हा ठेका द्यावा, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

शहरातील विस्तारलेल्या आठवडे भाजीपाला बाजाराचा विषय चर्चेला आला. त्यावर नगरसेवक दिलीप नागरे, मुजफ्फर शेख, भाजपचे दीपक चव्हाण, वैशाली चव्हाण यांनी भाग घेतला. शहरातील काही जागांवर आठवडी बाजाराचे आरक्षण आहे. त्या जागा विकसित करून मिनी मंडई उभारण्याची मागणी नागरे यांनी केली. पालिकेचे भाजी मंडईजवळील ऐतिहासिक घड्याळ बंद स्थितीत आहे. एका माजी नगरसेवकाने त्याविरुद्ध उपोषणाचा इशारा दिला आहे, असे भाजपचे श्रीनिवास बिहाणी म्हणाले. मुंबई येथील ठेकेदाराकडून हे काम करून घेतले जाईल, असे ससाणे यांनी सांगितले. आशा रासकर, स्नेहल खोरे, संतोष कांबळे, राजेंद्र पवार यांनी चर्चेत भाग घेतला.

# पत्नीच्या सांगण्यावरून पतीवर जीवघेणा हल्ला; मेहुण्यासह पाच जणांवर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर ।** पती-पत्नीमधील वादाचा खटला श्रीरामपूर न्यायालयात सुरू असताना राहुरी येथील पतीवर पत्नीच्या सांगण्यावरून मेहुण्यासह इतरांनी चाकू हल्ला केल्याची धक्कादायक घटना श्रीरामपूर येथे घडली. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुरी तालुक्यातील रामपूर येथील प्रवीण रंगनाथ पठारे (वय ३३) यांची पत्नी प्रिती हिच्याशी गेल्या तीन वर्षांपासून विभक्त राहते. ती सध्या श्रीरामपूर येथे आई-वडिलांकडे राहत असून दोघांमधील वादाचा खटला श्रीरामपूर न्यायालयात सुरू आहे.

दरम्यान, खटल्याच्या कामानिमित्त प्रवीण पठारे हे श्रीरामपूर येथे वकिलांना भेटण्यासाठी आले होते. काम आटोपल्यानंतर ते दाजी किशोर अभंग यांच्यासोबत दोन मोटारसायकलींवरून हॉटेल बुवा हलवाईसमोर नाश्त्यासाठी थांबले असता, दोन अनोळखी इसम त्यांच्या मोटारसायकलीवर बसले. त्यांनी चाकूचा धाक दाखवत आम्ही सांगतो तिकडे गाड्या घ्या, नाहीतर इथेच खुपसून टाकू, अशी धमकी दिली.

त्यानंतर दोघांना सूतगिरणी फाटा परिसरात नेण्यात आले. तेथे प्रवीण पठारे यांची पत्नी प्रिती, मेहुणा प्रथमेश गाडेकर व सोमनाथ तुवर हे उभे होते. त्यांनी प्रवीण पठारे यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. दोघांनी त्यांचे हात पकडून ठेवले असताना एका आरोपीने उजव्या बरगडीत चाकू खुपसल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

यानंतर पत्नीने शिवीगाळ करत याला मारून टाका, याची कायमची कटकट संपवा, असे म्हटल्याचा आरोपही फिर्यादीत करण्यात आला आहे. त्यानंतर सोमनाथ तुवर याने पुन्हा चाकूने वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो वार प्रवीण पठारे यांनी चुकवला. तरीही जखमी होऊन रक्तस्राव झाल्याने ते जागीच कोसळले. आरडाओरड ऐकून नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

या प्रकरणी प्रवीण पठारे यांच्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात प्रथमेश गाडेकर, सोमनाथ तुवर, प्रिती प्रवीण पठारे व दोन अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

# देवळाली प्रवरा नगरपरिषदेत जनगणनेचे विशेष प्रशिक्षण सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**राहुरी :** देवळाली प्रवरा नगरपरिषदेच्या वतीने आगामी जनगणनेच्या पार्श्वभूमीवर अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, जनगणना प्रक्रियेबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

चार्ज अधिकारी, मुख्याधिकारी ऋषिकेश पाटील आहेत. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी जनगणनेचे राष्ट्रीय महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजण्याची प्रक्रिया नसून देशाच्या विकासाचा पाया आहे. शासनाच्या विविध योजना, निधीचे नियोजन, तसेच सामाजिक व आर्थिक धोरणांची आखणी ही जनगणनेच्या अचूक आकडेवारीवर अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याने ही जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे आणि दक्षतेने पार पाडावी. त्यांनी पुढे डिजिटल पद्धतीने होणाऱ्या जनगणनेची माहिती देत तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्याचे आवाहन केले.

या प्रशिक्षणासाठी प्रकल्प अधिकारी सुनील गोसावी व माध्यमिक शिक्षक सचिन निमसे यांनी प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले. त्यांनी जनगणना प्रक्रियेतील विविध टप्पे, माहिती संकलनाच्या पद्धती, फॉर्म भरण्याचे नियम, तसेच प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडचणींवर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या सादरीकरणामुळे उपस्थितांना जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया स्पष्ट झाली.

यावेळी प्रशासकीय अधिकारी दीपक जग्रवाल यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला वसुली विभाग प्रमुख रामदास म्हस्के यांनी उपस्थितांचे स्वागत केले व प्रशिक्षणाच्या उद्देशाबद्दल थोडक्यात माहिती दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी ग्रंथपाल संभाजी वाळके यांनी आभार प्रदर्शन करत सर्व अधिकारी, प्रशिक्षक व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.या प्रशिक्षणामुळे जनगणना कार्य अधिक प्रभावी, अचूक आणि सुव्यवस्थित रितीने पार पाडण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.यावेळी जनगणना विभागाचे भूषण नवाल, वैभव ठोबरे सागर होले, गौरव शेळके यांनी विशेष परिश्रम घेतले.

# गोहत्या बंदी कायद्यासाठी नेवासा येथे मोर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** गोमातेला संविधानिकदृष्ट्या ''राष्ट्रमाता'' म्हणून मान्यता मिळावी आणि संपूर्ण भारतात गोहत्या बंदीसाठी कडक केंद्रीय कायदा संमत व्हावा या मागण्यांसाठी आज सकल हिंदू समाजाचे वतीने ''गो-सन्मान आवाहन अभियान'' अंतर्गत नेवासे तालुका कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता.

गोमाता सन्मान अभियान अंतर्गत सह्यांचे निवेदन देण्यासाठी काढण्यात आलेल्या मोर्चास नेवासे शहराचे ग्रामदैवत श्री मोहिनीराज मंदिर येथून संत-महंत, वारकरी व सकल हिंदू समाज बांधवांच्या सहभागाने प्रारंभ करण्यात आला. मोर्चा नेवासा तहसील कार्यालय येथे दाखल झाल्यानंतर तहसील आवारात बोलताना ज्ञानेश्वर मंदिर संस्थानचे प्रमुख विश्वस्त वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के म्हणाले, गाय ही सर्व विश्वाची माता आहे असे शास्रात सांगितले आहे. परंतु भारतात दुर्दव्य आहे. ज्या भारतीय संस्कृतीत ही गोष्ट सांगितली त्याच भारतात मोठ्या प्रमाणात गो हत्या, गायींच्या कत्तली होत आहेत ही बाब लच्छनास्पद गोष्ट आहे. त्यामुळे सर्व हिंदू धर्मियांची भावना लक्षात घेऊन केंद्र सरकारने याविषयी तातडीने पावले उचलून गोहत्या बंदीचा कायदा करावा असे आवाहन केले.

यावेळी महंत उद्धव महाराज मंडलिक,महंत ऋषिकेश महाराज, शुभम महाराज कांडेकर, महंत अवेराज महाराज,आ. विठ्ठलराव लंघे यांची भाषणे झाली. संत-महंतांसह आमदार विठ्ठलराव लंघे, नगराध्यक्ष डॉ करणसिह घुले, भाजप नेते सचिन देसरडा यांच्या हस्ते तहसीलदार डॉ संजय बिरादार व पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांना निवेदन देण्यात आले. यावेळी मोर्चात लक्ष्मीकांत महाराज जोंधळे, दत्तगिरी महाराज वृंदावन यांच्यासह शेकडो सकल हिंदू समाज व गोरक्षक, गो भक्त उपस्थित होते.



## कर्मवीर प्रबोधिनीत कुणाल पवार रयतमध्ये तृतीय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर :** तालुक्यातील टाकळीभान येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल व कै. अण्णासाहेब पटारे कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता सातवीचा विद्यार्थी कुणाल सोपान पवार याने कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत स्पर्धा प्रमाणपत्र परीक्षेत संस्थेमध्ये तृतीय क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने, जनरल बॉडी सदस्य बापूसाहेब पटारे, मंजाबापू थोरात, राहूल पटारे, मुख्याध्यापक आर.एम. शिंदे व शिक्षण प्रेमींनी त्याचे अभिनंदन केले. कुणाला हा श्रीरामपूर तालुक्यातील खिर्डी येथील प्रगतशील शेतकरी सोपान काशिनाथ पवार यांचा मुलगा आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

### वाढदिवसानिमित्त खाऊ, वह्या, कपडे वाटप



**सोनई** : गुरुकृपा बहुउद्देशीय प्रतिष्ठान आयोजित वाढदिवस साजरा करताना अनठाई खर्च होतो. या खर्चाला फाटा देऊन प्रणाली रुपेश कुसळकर हिच्या वाढदिवसा निमित्ताने गोरगरीब मुला - मुलींना खाऊ कपडे, वह्या, पेन, पुस्तके इतर वस्तू देऊन आगळा वेगळा उपक्रम रबावून आदर्श घालून दिला. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

### प्रवरेच्या महिला महाविद्यालयाला उत्कृष्ट क्रीडा आयोजन पुरस्कार



**लोणी** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा उत्कृष्ट क्रीडा स्पर्धा आयोजन पुरस्कार लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या महिला गृहविज्ञान व संगणक महाविद्यालयाला प्रदान करण्यात आला. मिरजगाव येथील महात्मा फुले नूतन महाविद्यालयात झालेल्या समारंभात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांच्या हस्ते महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षण संचालक डॉ. उत्तम अनाप यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी क्रीडा समिती अध्यक्ष डॉ. तानाजी धसाळ, संस्थापक अध्यक्ष डॉ. ए.बी. चेडे, माजी क्रीडा संचालक डॉ. दीपक माने आदी उपस्थित होते. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत शिक्षणाबरोबरच विविध खेळांना प्रोत्साहन दिले जाते. दर्जेदार क्रीडा सुविधा, मैदानांची उपलब्धता व प्रशिक्षित शिक्षकांमुळे संस्थेचे विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश मिळवत आहेत.

### २८४ केंद्रांवर सीईटी परीक्षा सुरू; तंत्रज्ञानावर आधारित प्रक्रियेमुळे सुरळीत



**गणोरे** : महाराष्ट्रातील कॉमन एंट्रन्स टेस्ट (CET) २०२६–२७ ला राज्यभरात सुरळीत सुरुवात झाली असून, २८४ परीक्षा केंद्रांवर १६ लाखांहून अधिक विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. मोठ्या प्रमाणावर परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रभावी नियोजन, समन्वय आणि मजबूत यंत्रणा कार्यरत असल्याचे दिसून आले आहे. परीक्षेतील एक महत्त्वाचा ठळक मुद्दा म्हणजे मुलींच्या सहभागात झालेली लक्षणीय वाढ. यामुळे स्पर्धात्मक परीक्षांमध्ये समावेशकता आणि संधींची समानता वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. CET आयुक्त श्री दिलीप बी. सरदेसाई (IAS) यांच्या मार्गदर्शनाखाली CET सेलने या वर्षी पारदर्शकता, सुरक्षितता आणि कार्यक्षमतेसाठी विविध तंत्रज्ञानाधारित उपाययोजना राबवल्या आहेत. यामध्ये रिअल–टाइम परीक्षा देखरेखीसाठी केंद्रीकृत डिजिटल मॉनिटरिंग प्रणाली, सीसीटीव्ही देखरेख, निरीक्षकांसाठी बॉडी कॅमेरे तसेच बायोमेट्रिक पडताळणी यंत्रणांचा समावेश आहे. CET सेल संपूर्ण प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवून असून, उच्च दर्जाचे आयोजन सुनिश्चित करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. विशेषतः मुलींच्या वाढत्या सहभागामुळे महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात समावेशकतेकडे होत असलेली प्रगती अधोरेखित होत आहे.

### संदीप कसार यांची दी आर्ट ऑफ लिविंग संस्थेच्या शिक्षक पदी निवड

**वडाळा महादेव** : श्री श्री रविशंकर विद्या मंदिर शाळेचे संस्थापक अध्यक्ष संदीप कसार यांची दि आर्ट ऑफ लिविंग संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेमध्ये निवड झाली. त्यांचा दि आर्ट ऑफ लिविंग संस्थेच्या वतीने व श्री श्री रविशंकर विद्या मंदिर शाळेच्या वतीने शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला. श्रीरामपूर तालुक्यातून विजुभाऊ सूर्यवंशी तसेच जागृती खटोड या दोघांची देखील दी आर्ट ऑफ लिविंग संस्थेच्या शिक्षक पदी निवड झाली असून हे सर्वजण यापुढे हॅप्पीनेस प्रोग्राम शिक्षक म्हणून आपले कामकाज करणार असून या सर्वांना पुढील वाटचालीस सामाजिक राजकीय व अध्यात्मिक स्तरातून शुभेच्छा देण्यात आल्या.

# खरीप हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी सामुहिक प्रयत्न करावे : आ. काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**कोळपेवाडी** : लहरी मान्सूनचा फटका याहीवर्षी खरीप हंगामाला बसण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. वेळेवर न पडणारा पाऊस व शेतमालाला मिळत असणारा अनिश्चित दर यामुळे शेतकरी अगोदरच अडचणीत आहे. तरी देखील या अडचणींचा विचार न करता शेतकरी मोठ्या हिम्मतीने आणि विश्वासाने खरीप हंगामाच्या पूर्वतयारीला लागला आहे.

महायुती शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून प्रशासनाने देखील आपली जबाबदारी ओळखून खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या अडचणी कमी कशा करता येतील याचा प्राधान्याने विचार करावा. शेतकऱ्यांना खरीप हंगामात कोणतीही अडचण येणार नाही याची काळजी घ्यावी व अडचणी आल्यास त्या अडचणी तात्काळ सोडवून खरीप हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी सामुहिक प्रयत्न करावे अशा सूचना आमदार आशुतोष काळे यांनी कृषी, महसूल, पाटबंधारे विभागाला दिल्या आहेत. आ.आशुतोष काळे यांनी सोमवार (दि.२७) रोजी कोपरगाव येथे पंचायत समिती कार्यालयात कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत खरीप हंगाम पूर्व नियोजन व आढावा बैठक घेतली.

या बैठकीत कोपरगाव विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांना खरीप हंगामात येणाऱ्या संभाव्य अडचणी टाळण्याबाबत व त्यावर करावयाच्या उपाययोजना बाबत त्यांनी कृषी विभागाला मार्गदर्शन केले याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, खत निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल हा परदेशातून आयात केला जात असल्यामुळे जागतिक युद्धजन्य परिस्थिती पाहता खरीप हंगामात खतांचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्याचा फटका खरीप हंगामात शेतकऱ्यांना बसणार नाही यासाठी कृषी विभागाने योग्य नियोजन करावे. संभाव्य परिस्थिती हाताळण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच पूर्व नियोजन करणे आवश्यक आहे. तालुक्याला खतांचा जास्तीत जास्त कोटा कसा मिळेल आणि त्याचा पुरेसा साठा कसा करता येईल यावर भर द्यावा.

तसेच खत आणि बियाणांच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या येणाऱ्या तक्रारी गांभीर्याने घेऊन दोषींवर कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले. दिवसेंदिवस वाढत्या तापमानाचा विपरीत परिणाम शेती व्यवसायावर होत असून परीणामी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. हे नुकसान टाळण्यासाठी पाट पाण्याचे नियोजन काटेकोरपणे करणे गरजेचे आहे. हवामान खात्याचा अंदाज लक्षात घेऊन शेतकऱ्यांना पेरणी आणि कापणीच्या संदर्भात अधिकृत माहिती पुरवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

जेव्हा नैसर्गिक संकट येते त्यावेळी महसूल आणि कृषी सहाय्यक यांचा अहवाल अत्यंत महत्त्वाचा ठरतो. मात्र अनेकदा काही लोक राजकीय हेतूने पात्र शेतकऱ्यांची नावे यादीतून वगळण्याचा प्रयत्न करतात ही बाब अत्यंत गंभीर आहे. अशा कोणत्याही दबावाखाली न येता एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही याची संबंधित अधिकाऱ्यांनी काळजी घ्यावी. पीक विम्याच्या बाबत सर्व यंत्रणांनी एकत्र येऊन काम केल्यास शेतकऱ्यांना वेळेत भरपाई मिळणे शक्य होईल यामुळे सर्व विभागांनी एकत्रित काम करून शेतकऱ्यांचे हित जोपासणे गरजेचे असून सामुहिक प्रयत्नातून खरीप हंगाम यशस्वी करावा सूचना आ. आशुतोष काळे यांनी बैठकीत सर्व अधिकाऱ्यांना दिल्या आहे.

या बैठकीसाठी उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, गटविकास अधिकारी संदिप दळवी, नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते, कृषी अधिकारी मनोज सोनवणे, महाबीजचे कृषी क्षेत्र अधिकारी, सर्व मंडळ अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, सहाय्यक कृषी अधिकारी, कृषी सेवा केंद्र प्रतिनिधी, कृषी सेवक आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'नानफा ना तोटा' तत्त्वावर माळेवाडी-रामेश्वर तीर्थयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**माळवाडगांव** : माळेवाडी ते रामेश्वर या पवित्र तीर्थयात्रेला यंदा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, 'नानाफा ना तोटा' या सामाजिक तत्त्वावर ही यात्रा यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. या उपक्रमामुळे सर्वसामान्य भाविकांवर कोणताही आर्थिक भार न पडता, त्यांनी मोठ्या श्रद्धेने यात्रेत सहभाग नोंदविला आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय व समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यात्रेचे नियोजन व आयोजन भाजपा किसान मोर्चाचे माजी तालुका अध्यक्ष मोहन वमने यांनी पुढाकार घेऊन केले असून, त्यांच्या या सेवाभावी कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. यात्रेच्या मार्गावर भाजपा तालुका अध्यक्ष बाबासाहेब चिडे यांनी स्वतः उपस्थित राहून यात्रेकरूंचे सहर्ष स्वागत केले.

तसेच मोहन वमने व त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. भाविकांच्या सोयीसाठी चहा, पाणी व नाश्त्याची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. या आदरातिथ्यामुळे थकलेल्या यात्रेकरूंना दिलासा मिळाला व त्यांनी समाधान व्यक्त केले. या स्वागत प्रसंगी दिलीप औताडे, रामेश्वर वमने, सरपंच देविदास वमने, राजेंद्र बनसोडे, तालुका कृषी अधिकारी टेमकर, रामभाऊ औताडे, भाऊसाहेब वमने, गोपीनाथ वमने, दिलीप खरात तसेच चौधरी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्वांनी मिळून यात्रेकरूंची सेवा करत उपक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. सामाजिक व धार्मिक कार्यात नेहमीच पुढाकार घेणाऱ्या बाबासाहेब चिडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मोहन वमने यांच्या नेतृत्वात पार पडलेला हा उपक्रम समाजात एकोप्याची भावना अधिक दृढ करणारा ठरत आहे. यात्रेकरूंच्या वतीने सर्व आयोजक व मान्यवरांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

## त्रिमूर्ती महाविद्यालय 'उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या वतीने शिक्षण महर्षी साहेबराव घाडगे पाटील यांच्या त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय हा मानाचा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चांगदेव आरसुळे यांनी स्वीकारला. यावेळी फिजिकल डायरेक्टर प्रा.नितीन चिरमाडे उपस्थित होते.

सदर पुरस्कार नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.संजीव सोनवणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पुणे विद्यापीठ क्रीडा संचालक डॉ.सुदाम शेळके,माजी क्रीडा संचालक डॉ.दीपक माने यांची प्रमुख उपस्थित होते. त्रिमूर्ती महाविद्यालयाने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आपले नाव उच्च पातळीवर पोहोचविले आहे. विशेषतः क्रीडा प्रशिक्षक छबुराव काळे,अभिजित दळवी, कबड्डी प्रशिक्षक संभाजी निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली वेदांत वाघमारे, पार्थ कोरडे, साक्षी एडके, प्रतीक ठाकूर आणि वैष्णवी काळे या खेळाडूंनी राज्य, राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावर चमकदार कामगिरी करत त्रिमूर्ती महाविद्यालयाच्या यशाची पताका फडकावली आहे. त्रिमूर्ती महाविद्यालयास उत्कृष्ट क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड. सुमतीताई घाडगे, उपाध्यक्ष स्नेहलताई घाडगे,चेतन चव्हाण, डॉ.गौरव आमले पाटील,डॉ. श्रुती आमले, मनीष घाडगे, सीनियर कॉलेजच्या समन्वयक डॉ. अनुराधा गोरे तसेच संस्थेतील सर्व प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले. या यशामुळे त्रिमूर्ती महाविद्यालयाचा नावलौकिक अधिक वृद्धिंगत झाला असून विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा क्षेत्राबद्दल नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## महिला बचत गटांना ड्रोन तंत्रज्ञानातून स्वयंपूर्णतेकडे वाटचाल : शालीनीताई विखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**लोणी** : महिला बचत गटांना ड्रोन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्वयंपूर्ण करण्यावर शासनाचा भर असून, या तंत्रज्ञानामुळे शेती क्षेत्राला मोठी मदत होणार असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी केले. महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), अहिल्यानगर यांच्या जिल्हा वार्षिक योजना २०२५–२६ अंतर्गत उद्योग व रोजगार निर्मितीसाठी विशेष योजनेच्या माध्यमातून लोकसंचालित साधन केंद्रांतर्गत समाविष्ट महिला बचत गटांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे.

जनसेवा फाउंडेशन, लोणी यांच्या संयुक्त विद्यमाने शिर्डी मतदारसंघाती पहिल्या टप्पातील १३ ड्रोनव्दारे महिला बचत गटांना शेती व्यवसाय किफायतशीर व्हावा तसेच रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी व्हावा यासाठी ड्रोनचे वितरण करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा शुभारंभ शालिनीताई विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, अहिल्यानगरचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे, तसेच भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून जिल्हा नियोजन मंडळाच्या साहाय्याने केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना महिला बचत गटांपर्यंत पोहोचविण्यात येत आहेत.

जनसेवा फाउंडेशनने सुरुवातीपासूनच या कामात पुढाकार घेतला असून आज जिल्ह्यात सुमारे ४० हजारांहून अधिक महिलांचे बचत गट संघटित झाले आहेत. या महिलांना विविध व्यवसायांबरोबरच आधुनिक शेती तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यात येत आहे. उत्पादन तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग, भाजीपाला प्रक्रिया, तसेच उत्पादित मालाच्या विक्री व्यवस्थेचे प्रशिक्षण दिले जाते. केवळ प्रशिक्षणच नव्हे, तर महिलांना प्रत्यक्ष विक्री करता यावी यासाठी विविध शासकीय योजनांतून आर्थिक मदतही केली जाते. ड्रोन तंत्रज्ञानामुळे शेतीत वेळ व खर्चाची बचत होऊन रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी होणार आहे.

त्यामुळे शेती उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल. या तंत्रज्ञानाचा महिलांनी योग्य वापर करून आपल्या शेतीत अधिक उत्पादन मिळवावे, असे आवाहनही सौ. विखे पाटील यांनी केले. यावेळी संवत्सरचे सरपंच विवेक परजणे, माविमचे तालुका प्रमुख दीपक लुटे, जनसेवा फाउंडेशनच्या प्रकल्प संचालिका रुपाली लोंढे, सुनील आहेर, वावगे ग्रीन कृषी विमान व ब्रिज टेक इंडस्ट्रीज प्रा. लि. अहिल्यानगरचे निलेश गागरे, अनिकेत झांबरे, भगवान म्हसे,निता कांदळकर आदी उपस्थित होते.

## गाडगेबाबांच्या विचारांचा समाजात दीप प्रज्वलित करूया : बोरसे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपुर** : राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या १५० व्या जयंतीनिमित्त शिर्डी येथील हॉटेल जे. के. पॅलेसमध्ये २८ वे राष्ट्रसंत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलन उत्साहात संपन्न झाले. या संमेलनात भारतीय धोबी महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष एकनाथराव बोरसे यांनी मार्गदर्शन करताना गाडगेबाबांच्या विचारांचा समाजपरिवर्तनासाठी अवलंब करण्याचे आवाहन केले. देव दगडात नसून माणसात आहे. अज्ञान दूर करण्यासाठी शिक्षण हेच प्रभावी शस्त्र आहे, असे सांगत बोरसे म्हणाले, गाडगेबाबांची दशसूत्री आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे. गाव स्वच्छ ठेवा आणि मन स्वच्छ ठेवा हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देणाऱ्या गाडगेबाबांच्या विचारांची आज मोठी गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा 'राष्ट्रीय डेबूजी संत गाडगेबाबा सन्मान' देऊन गौरव करण्यात आला. यावेळी विशेष टपाल तिकीटाचे अनावरणही करण्यात आले. संमेलनात साहित्यिक राजेंद्र फंड लिखित जीवनदीप गाडगेबाबांचा या कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकाची प्रस्तावना बोरसे यांनी लिहिली आहे. कवितेच्या माध्यमातून गाडगेबाबांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## कुस्तीच्या झुंजींनी रंगली बिरोबा यात्रा; महिलांना मानाच्या पैठण्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : राहाता तालुक्यातील हनुमंतगाव येथील ग्रामदैवत बिरोबा महाराजांचा तीन दिवस चाललेला यात्रोत्सव प्रचंड गर्दी, उत्साह आणि शिस्तबद्ध नियोजनात कुठलाही अनुचित प्रकार न घडता पार पडला. उष्णतेची तीव्रता असतानाही भाविकांच्या उत्साहामुळे यंदा यात्रेला विक्रमी गर्दी झाली. यात्रेतील पारंपरिक कुस्ती स्पर्धा हा मुख्य आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. आखाड्यात रंगलेल्या चुरशीच्या झुंजींनी ग्रामस्थांना अक्षरशः खिळवून ठेवले. अहिल्यानगर जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेरील बलाढ्य आणि नवोदित मल्लांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

प्रत्येक झुंज ही जिद्द, ताकद आणि डावपेचांची कसोटी ठरत होती. काही लढती शेवटच्या क्षणापर्यंत रंगतदार ठरल्याने प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात मल्लांना दाद दिली. महिला कुस्तीपटूंच्या सहभागामुळे आखाड्याचे वातावरण अधिक रंगतदार झाले. शनिवारी रात्री फेमस नृत्यांगना स्नेहा भुजबळ यांच्या ऑर्केस्ट्राने ग्रामस्थांना भुरळ घातली. 'खेळ पैठणीचा' या विशेष कार्यक्रमात सुमन पवार, निर्मला पर्वत, विमल डोखे, वैशाली जेजुरकर, वर्षा घोलप, मिना मेहेरे, संगिता कानडे, अंजली फणसे, उज्ज्वला तुंबारे, साक्षी पाबळे आणि शालन माळी या अकरा महिलांना अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे व स्नेहा भुजबळ यांच्या हस्ते मानाची पैठणी देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला महिला भगिनींची मोठी उपस्थिती लाभली. रविवारी सायंकाळी मानाच्या काठीची भव्य मिरवणूक ढोल–ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत काढण्यात आली. बिरोबा महाराजांची विधिवत पूजा करून वाण–वह्याचा कार्यक्रम पार पडला. आकर्षक आतिषबाजीने उपस्थितांचे लक्ष वेधले. त्यानंतर सदाबहार गाण्यांचा ऑर्केस्ट्रा रंगला. सोमवारी सायंकाळी जंगी कुस्ती स्पर्धांनी यात्रेची सांगता झाली. डफ–ताशांच्या गजरात 'बिरोबा महाराज की जय' च्या जयघोषात स्पर्धांना सुरुवात झाली. विजेते व उपविजेते मल्लांना यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने रोख बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे, उपाध्यक्ष दिपक घोलप, खजिनदार विकास अनाप, अशोक घोलप, संजय अनाप, भानुदास डोखे, भागवत ब्राम्हणे, बाळासाहेब पाबळे, अतुल कुलकर्णी, गोरक्षनाथ ब्राम्हणे, भगवान प्रधान, पोपटराव पवार, अनिल बुचुडे, रविंद्र पर्वत, सुदर्शन राहिंज, अविनाश तुंबारे, सोपान मांढरे यांच्यासह यात्रा कमिटीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. लोणी पोलीस स्टेशनचे पीएसआय वाघ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवत उत्कृष्ट कामगिरी बजावली. अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे यांच्या नेतृत्वाखाली यात्रोत्सव शांततेत व सुरळीत पार पडल्याबद्दल यात्रा समितीच्या वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले.

## श्रीरामपूरच्या 'देवदूत' लघुपटाने मारलं पुण्याचं मैदान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : ग्रामीण भागातील कलागुणांना योग्य वाव मिळाल्यास ते जागतिक स्तरावर आपली मोहोर उमटवू शकतात, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. श्रीरामपूरच्या मातीत तयार झालेला व येथील दिग्दर्शक गणेश बिरदवडे यांच्या 'देवदूत' या लघुपटाने पुणे येथे संपन्न झालेल्या 'द बुद्धा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल २०२६' मध्ये बाजी मारली आहे. या लघुपटाने महोत्सवात 'सर्वोत्कृष्ट शॉर्ट फिल्म' म्हणून प्रथम पारितोषिक पटकावत श्रीरामपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. पुणे येथील या प्रतिष्ठित महोत्सवात देशभरातून अनेक लघुपट सादर करण्यात आले होते.

मात्र, आशयघन मांडणी आणि उत्कृष्ट सादरीकरणामुळे 'देवदूत'ने परीक्षकांसह प्रेक्षकांचीही मने जिंकली. या लघुपटाची निर्मिती आशादेवी किशोर जाधव व गणेश बिरदवडे यांची असून, रवी जावरे यांच्या छायाचित्रणाने कथेला वेगळी उंची मिळवून दिली आहे. लघुपटात संगीता वाघमारे, अस्मिता मोरे, गोरख गायकवाड आणि दीपक गोर्डे या कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. ग्रामीण भागातील मर्यादित संसाधने असतानाही केवळ जिद्दीच्या जोरावर बिरदवडे आणि त्यांच्या टीमने ही कलाकृती साकारली.

कथेतील जिवंतपणा आणि कलाकारांच्या कसदार अभिनयामुळे ही फिल्म महोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरली. या यशाबद्दल प्रांताधिकारी किरण सावंत पाटील, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, ग्राम महसूल अधिकारी राजेश घोरपडे, आकाश करपे यांसह तालुक्यातील विविध क्षेत्रांतून गणेश बिरदवडे आणि त्यांच्या संपूर्ण टीमवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ही यशोगाथा ग्रामीण भागातील नवोदित कलाकारांसाठी मोठी प्रेरणा ठरणारी आहे.


### जाहीर नोटिस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, खालील नमुद परिशिष्टातील नमुद मिळकतीपैकी त्यांचे मालक / भोगवाटदार ठकाजी भागवत जगताप यांनी त्यांचे हिश्याचे क्षेत्र हे.००.१०.आर विक्री करण्याचे ठरविले आहे. परिशिष्टात नमुद मिळकतीबाबत व संर्दभात कोणत्याही व्यक्तिची अगर संस्थेची तक्रार असल्यास अगर मिळकतीवर गहाण, दान, लिन, लिज, इ. अगर इतर हक्क हितसंबंध असल्यास लेखी हरकत कागदपत्रानिशी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन ०३ दिवसाच्या आत नोंदवावी. मुदतीत न आलेल्या हरकतीचा कोणताही विचार होणार नाही व ती हरकत मिळकतीचे मालक / भोगवाटदार यांचेवर बंधनकारक असणार नाही व ते मिळकतीबाबत पुढील विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन- जि.अहमदनगर, सब-डिस्ट्रीक्ट व. ता. राहाता पैकी मौजे निघोज येथील मिळकत सर्व्हे नंबर / गट नंबर २४६ पैकी क्षेत्र ००.७५.३४ आर पैकी ठकाजी भागवत जगताप यांचे अविभाज्य हिश्याचे क्षेत्र हे.००.१०.आर आकार क्षेत्राप्रमाणे

यांसी चतुःसिमा- रेकॉर्डप्रमाणे

येणेप्रमाणे मिळकत तदंगभुत वस्तु व वहीवाटीचे हक्कासह हरकत नोंदविण्यासाठी पत्ता

**ॲड. अमित दिलीप गोऱ्हे**
BSL.LL.B.
**युनियन बँक ऑफ इंडीयाचे समोर राहाता**
**ता.राहाता, जि.अहिल्यानगर मो नं.९२२६३५५६७९**


### ग्राहकाला १४ लाखांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश

कोपरगाव..प्रतिवादी हे महाराष्ट्रातील 'शिर्डी हॉटेल सिटी हार्ट'चे (जिल्हा अहमदनगर) मालक आहेत. रायचूर, कर्नाटक येथील जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाकडे, घडलेल्या एका विद्युत अपघातासंदर्भात तक्रार क्र. उ.उ.छे.: १३१/२०२५ अन्वये तक्रार दाखल करण्यात आली होती.

श्री. नितीन भानुदास औताडे यांच्या मालकीच्या 'हॉटेल सिटी हार्ट'मध्ये घडलेल्या विद्युत अपघातामुळे उद्भवलेला वैद्यकीय खर्च आणि इतर खर्चापोटी नुकसानभरपाई मिळावी, या मागणीसह श्री. मंजुनाथ पाटील यांनी सदर तक्रार दाखल केली होती. जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने या तक्रारीचा निपटारा केला आहे. (आयोगाचे सदस्य: श्री. सुरेंद्र कुमार आणि श्री. प्रभुदेव पाटील के.)

ग्राहकाची तक्रार ग्राह्य धरण्यात आली असून, दिनांक ११/११/२०२५ पासून लागू होणारा निकाल देण्यात आला आहे. यानुसार, वैद्यकीय खर्चापोटी १४,१७,४०० रुपये (६% व्याजासह), सेवा शुल्कापोटी ८,००० रुपये आणि खटल्याच्या खर्चापोटी ५,००० रुपये (४५ दिवसांसाठी) देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दिनांक १७-०४-२०२६ रोजी ग्राहकाच्या बाजूने अंतिम निकाल जाहीर करण्यात आला. ग्राहकाच्या वतीने ड. एस. ई. नारायण राव, ड. एम. एच. पाटील आणि ड. अरुण लोंगाणी यांनी युक्तिवाद केला.


### सायटेशन नोटीस

प्रो.फी.जमा.रु.
पान.नं.
दि. / /२०२६

शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात
चौ.अ.नं. १४३/२०२६

**अर्जदार** - मंथाबाई हनुमंत खंडागळे रा. आंतरवाली खुर्द ता. शेवगाव
**सामनेवाला** – सरकार

सदर अर्जदार हा मौजे आंतरवाली खुर्द येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार मंथाबाई हनुमंत खंडागळे रा. आंतरवाली खुर्द ता. शेवगाव जि. अहिल्यानगर यांच्या पतीचा हनुमंत अहिलाजी खंडागळे यांचा मृत्यू दिनांक २७.०४.२०२१ मौजे आंतरवाली खुर्द.ता. शेवगाव जि.अ.नगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे मृत्यूचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म / मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहून गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या पतीची मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांच्या पतीची मृत्यु नोंद पंचायत समिती कार्यालय/ग्रापचांयत कार्यालय यांच्या जन्म मृत्यु नोदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार याने नगरपरिषद / ग्रामपंचायत कार्यालय येथे जावुन जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात मृत्युची नोंद नसलेबाबत दि. ३०.०५.२०२५ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्म/मृत्युच्या च्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांच्या पतीची मृत्यु नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहून अर्जदाराचे सदरहू जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन पंधरा दिवसाचे आत दि. ३०/०४/२०२६ पुर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहुन कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जेन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दि. १५/०४/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

**हुकमावरुन**
**तहसिलदार शेवगाव**

## पान १ वरुन

## विवेक कोल्हे यांना भाजपची उमेदवारी जाहीर!

माधवी नाईक: अनेक वर्षांपासून संघटनेत सक्रिय असलेल्या नाईक यांना महिला प्रतिनिधी म्हणून संधी देण्यात आली आहे. प्रज्ञा सातव: काँग्रेसच्या आमदारकीचा राजीनामा देऊन भाजपमध्ये दाखल झालेल्या प्रज्ञा सातव यांना पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी देऊन भाजपने दिलेला शब्द पाळला आहे.

### उत्तरप्रदेशच्या धर्तीवर राज्यातही खते लीकिंग बंद करणार : कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

तसेच गृह विभाग आणि प्रत्येक पोलीस विभागाला पत्र पाठवून कडक कारवाई करण्याची व्यवस्था करण्यात येईल. केंद्र सरकारने बियाण्यांच्या उत्पादनापासून विक्रीपर्यंतच्या संनियंत्रणासाठी साथी पोर्टल विकसित केले आहे. मंत्री भरणे म्हणाले की, हा पोर्टल बियाणे उत्पादक व पुरवठादार कंपन्या या स्तरावर राबविणे ही सर्वांसाठी एक चांगली यंत्रणा आहे आणि याचा योग्य वापर सर्वांनी करावा. विक्रेत्यांना येणाऱ्या अडचणींबाबत शासन नेहमीच सकारात्मक भूमिका घेणार आहे. आवश्यकतेनुसार पंधरा दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे कालावधी वाढवता येईल आणि विक्रेत्यांच्या अडचणींवर मार्ग काढला जाईल. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, ई-पॉस वापरकर्त्यांवर तात्पुरती स्वरूपात कारवाई केली जाणार नाही. राज्यातील कृषि निविष्ठा संदर्भातील विविध प्रश्नांबाबत केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा यांची भेट घेऊन मार्ग काढला जाईल.विक्रेत्यांनी बियाणे पुरवठादार कंपन्यांक डून सीलबंद पॅकेजिंगमध्ये खरेदी करून शेतकऱ्यांना त्याच स्वरूपात विक्री केली असल्यास, तपासणीम ध्ये बियाणे, रासायनिक खते किंवा किटकनाशकांचे सॅम्पल फ ेल झाल्यास, हरियाणा राज्याने ज्या प्रकारे विक्रेत्यांना आरोपी न करण्याचा निर्णय घेतला त्याचा अभ्यास करुन महाराष्ट्रात पुढील निर्णय घेतला जाईल. तसेच, मुदतबाह्य किटकनाशके पुरवठादार कंपन्यांनी विक्रेत्यांकडून परत घेऊन योग्य तो निर्णय घेण्यासाठी माफदा व विविध कंपन्यांसोबत चर्चा केली जाईल.

## सुपा चौकात भीषण ट्रॅफिक जॅम पर्यायी मार्गाची मागणी तीव्र

**सुपा :** गेल्या आठ ते दहा दिवसांपासून सुपा नगर–पुणे महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून, सुपा चौक परिसरात वाहनांची लांबच लांब रांग लागल्याचे चित्र दिसत आहे. सुपा चौकापासून सुमारे अर्धा किलोमीटर नगरकडे आणि अर्धा किलोमीटर पुण्याकडे वाहनांची गर्दी होत असून, वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. उन्हाच्या तीव्र तडाख्यात या ट्रॅफिक जॅममुळे प्रवासी, नागरिक तसेच वऱ्हाडी मंडळी अक्षरशः हैराण झाली आहेत. सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने वाहनांची संख्या वाढली असून, आधीच अरुंद असलेल्या रस्त्यावर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिका, शालेय बस आणि अत्यावश्यक सेवांच्या वाहनांनाही मार्ग काढणे कठीण होत आहे. अनेक वेळा वाहनचालकांना तासन्तास एकाच ठिकाणी अडकून राहावे लागत असल्याने वेळेचे मोठे नुकसान होत असून, नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे सुपेकरांकडून



कायमस्वरूपी उपाय म्हणून बाह्य वळण रस्ता (बायपास) किंवा उड्डाणपूल (फ्लायओव्हर) उभारण्याची जोरदार मागणी होत आहे. दरम्यान, वाहतूक पोलीस परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करत असले तरी वाढत्या वाहनसंख्येमुळे ते अपुरे पडत आहेत. त्यामुळे प्रशासनाने तातडीने पर्यायी वाहतूक मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. सुपा चौकातील ट्रॅफिक जॅम हा आता दैनंदिन प्रश्न बनला आहे. यावर कायमस्वरूपी उपाय न केल्यास परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते, अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.

**सुपा चौकात सर्कल व ४ ट्रॅफिक पोलिसांची गरज – अविनाश पवार**

**नगर–पुणे महामार्गावरील सुपा चौकात वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर तातडीने सर्कल उभारणे व चार ट्रॅफिक पोलिसांची नेमणूक करणे आवश्यक असल्याची मागणी मनसे तालुका अध्यक्ष अविनाश पवार यांनी केली आहे. चौकात योग्य नियोजनाचा अभाव असल्याने वारंवार ट्रॅफिक जॅम होत आहे. सर्कल आणि पोलिस व्यवस्था असल्यास वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरळीत होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.**

**अंतर्गत रस्त्यांवरून वाहतूक; नागरिकांच्या जीवितास धोका** सुपा चौकातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी काही वाहनचालकांनी गावातील अंतर्गत रस्त्यांचा वापर सुरू केला असून, त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. ज्या चालकांना हे आतील रस्ते माहीत आहेत, ते ट्रॅफिक टाळण्यासाठी सरळ गावातून मार्ग काढत आहेत. मात्र, हे रस्ते लोकवस्तीतील असून येथे लहान मुले खेळत असतात, तसेच महिला व ज्येष्ठ नागरिकांचा मोठ्या प्रमाणात वावर असतो. अशा परिस्थितीत अचानक वाढलेली वाहनांची ये–जा अत्यंत धोकादायक ठरत आहे. अरुंद रस्ते, वेगाने धावणारी वाहने आणि नियंत्रणाचा अभाव यामुळे अपघाताची भीती वाढली आहे. ट्रॅफिकपासून बचावासाठी गावातील रस्त्यांचा वापर केला जातो; पण एखादा अपघात झाला तर जबाबदार कोण? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकाराबाबत सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून गावातील अंतर्गत रस्त्यांवरून बाहेरील वाहतूक बंद करण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी वेगमर्यादा, स्पीड ब्रेकर व पोलिस बंदोबस्त वाढवण्याची गरज व्यक्त होत असून, अन्यथा गंभीर दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नाही.

# गोदा–नर्मदा जलयात्रेचे गंगापूरात जल्लोषात स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** जलसंवर्धन, नदी पुनरुज्जीवन आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाचा व्यापक संदेश देणारी 'गोदा ते नर्मदा' जलयात्रा सोमवारी दुपारी गंगापूर शहरात उत्साहपूर्ण वातावरणात दाखल झाली. गंगापूर–वैजापूर रोडवरील शिवपार्वती मंगल कार्यालय येथे यात्रेचे भव्य स्वागत करण्यात आले. ढोल–ताशांच्या गजरात, घोषणाबाजी आणि जलसंवर्धनाच्या संदेशांनी परिसर दणाणून गेला.

यात्रेच्या स्वागतासाठी विविध सामाजिक संस्था, युवक मंडळे, महिला बचत गट, ग्रामस्थ आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जलसंवर्धन ही काळाची गरज असून नदी संवर्धनासाठी लोकसहभाग वाढवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते यात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी जलसंधारण, बंधारे पुनर्वसन आणि सिंचन योजनांच्या माध्यमातून तालुक्यात पाणी प्रश्न सोडवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.स्वागत प्रसंगी बोलताना आमदार प्रशांत बंब म्हणाले, पाणी हीच भविष्यातील खरी संपत्ती आहे. आजच्या पिढीने पाण्याचे महत्त्व ओळखून जलसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारली



पाहिजे. गोदावरीपासून नर्मदेपर्यंत पोहोचणारा हा संदेश प्रत्येक गावापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. जलसंधारण ही केवळ सरकारी योजना नसून ती लोकचळवळ झाली पाहिजे.

कार्यक्रमात महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलप्रश्नांवर बोलताना गंगापूर–वैजापूर मतदारसंघात सुरू असलेल्या विकासकामांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, पाणीटंचाई ही राज्यासमोरील गंभीर समस्या असून जलसंधारणासाठी लोकसहभाग वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. ते म्हणाले, गंगापूर तालुक्यातील सिंचन आणि जलसंधारणाच्या कामांसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार प्रशांत बंब हे कार्यक्षम नेतृत्व आहे. ऐतिहासिक बंधाऱ्यांचे पुनर्वसन, पाणीसाठा वाढवण्याचे प्रयत्न आणि सिंचन योजनांना चालना देण्याचे काम भविष्यात मोठा बदल घडवेल. यावेळी आमदार गोपीचंद पडळकर यांनी जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले, नद्या वाचल्या तरच शेती वाचेल आणि शेती वाचली तरच गाव समृद्ध होईल. प्रत्येक गावाने पाण्याच्या साठवणुकीसाठी आणि संवर्धनासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

कार्यक्रमास खासदार रामराव वडकुते, आमदार सदाभाऊ खोत, नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, पंचायत समिती सभापती कविताताई चव्हाण, जयमालाताई वाघ, मनीषाताई व्यवहारे, कावेरी पाहुणे,नगरसेवक विजय पानकडे ,मारुती खैरे, भाग्येश गंगवाल, राकेश कळसकर, आबासाहेब शिरसाठ, अमोल जाधव, रवींद्र चव्हाण, संजय पांडव, रामेश्वर पाटील, अप्पासाहेब हिवाळे, ज्ञानेश्वर सवई, अरुण सागर, सुमित मुंदडा, अतुल, रासकर, प्रशांत मुळे, अप्पासाहेब पाचपुते, मधुकर वालतुरे, सुरेश शिंदे, गोपाल वर्मा, रज्जाक पठाण, कृष्णकांत व्यवहारे, आशिष शहाणे, गणेश शिंदे, सचिन विधाटे,अरुण रोडगे, राऊसाहेब तोगे,संपत रोडगे,आदी सह भाजपा कार्यकर्ते व अधिकारी कर्मचारी उपस्थित नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी, कर्मचारी आणि भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानण्यात आले. गंगापूरमध्ये झालेल्या या भव्य स्वागतामुळे 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेला नवी ऊर्जा मिळाली असून जलसंवर्धनाबाबत जनजागृतीची ठोस सुरुवात झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# नवीन सोलर धोरण राज्यातील उद्योगांना मारक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्य सरकारने आणलेल्या नवीन सोलर धोरणातील ग्रीड सपोर्ट चार्जेस, चुकीची नेट मीटरिंग प्रणाली, अवाजवी इलेक्ट्रिसिटी ड्युटी व बॅटरीची अनिवार्यता राज्यातील उद्योगांना मारक ठरत आहे. एक एप्रिलपासून लागू केलेल्या या धोरणामुळे उद्योगांना मोठा आर्थिक फटका बसत असून, अनेक प्रकल्प दिवाळखोरीच्या वाटेवर आहेत. परिणामी, महाराष्ट्रातील उद्योग अन्य राज्यात स्थलांतरित होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उद्योग आघाडीने पत्रकार परिषदेत केला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उद्योग आघाडीचे प्रदेश सरचिटणीस मनीष कोंडे व पश्चिम महाराष्ट्राचे उपाध्यक्ष सागर शिनगारे यांनी पत्रकार घेऊन हे सोलर धोरण महाराष्ट्राच्या उद्योगांना मारक असल्याचे सांगितले. मनीष कोंडे म्हणाले, ''महाराष्ट्रातील नवीन सोलर धोरणामुळे उद्योगांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. ग्रीड सपोर्ट चार्जेस, नेट मीटरिंग बदल व अतिरिक्त वीज अधिभार प्रस्तावाविरोधात उद्योजकांचा तीव्र निषेध व्यक्त होत आहे. राज्यातील हजारो उद्योग, सोलर ईपीसी कंपन्या, तसेच लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) गंभीर आर्थिक अडचणीत सापडले आहेत. बँकिंगवरील निर्बंध आणि बॅटरी (हायब्रीड) प्रणालीकडे वाढता कल यामुळे सोलर प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. याशिवाय, स्वतः वापरल्या जाणाऱ्या सोलर वीजेवर वीज अधिभार लागू होत असल्याने उद्योगांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.'' ''दर महिन्याला एक लाख युनिट सोलर वीज निर्मिती करणाऱ्या उद्योगाला पूर्वी सुमारे १० लाखांची बचत होत होती. मात्र नवीन धोरणानंतर ही बचत केवळ दोन लाखांपर्यंत मर्यादित राहिली असून, दर महिन्याला जवळपास ७ ते ८ लाखांचा तोटा सहन करावा लागत आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड औद्योगिक पट्ट्यात अंदाजे ८०० ते १५०० उद्योग प्रभावित झाले असून, संपूर्ण महाराष्ट्रात ५००० ते १०००० उद्योगांवर या धोरणाचा गंभीर परिणाम झाला आहे. यामुळे राज्यातील उद्योगांना दरवर्षी अंदाजे ५००० ते ९००० कोटींचा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. तसेच सोलर क्षेत्रातील हजारो रोजगार धोक्यात आले आहेत, असेही कोंडे यांनी नमूद केले.

# शिरूरमध्ये १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी आंदोलनाचा इशारा

## चुकीच्या प्रस्तावावर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शिरूर शहरासाठी अत्यावश्यक ठरणाऱ्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या उभारणीसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईविरोधात भाजप महिला आघाडी आक्रमक झाली आहे. चुकीचा व अपूर्ण प्रस्ताव सादर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी तसेच दुरुस्त व परिपूर्ण प्रस्ताव तातडीने सादर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा दि. ४ मे २०२६ पासून बेमुदत उपोषण आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

या संदर्भात जिल्हाधिकारी, पुणे तसेच तहसीलदार, पोलिस स्टेशन शिरूर यांना निवेदन देण्यात आले. दि. ११ सप्टेंबर २०२५ पासून सातत्याने पाठपुरावा करूनही अद्यापपर्यंत योग्य प्रस्ताव सादर न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. उलट वरिष्ठांकडे चुकीचा प्रस्ताव पाठवण्यात आल्यामुळे ही बाब अधिक गंभीर बनली आहे.

दरम्यान, अलीकडेच शिरूर शहरात एका गरीब गर्भवती महिलेला वेळेत उपचार न मिळाल्यामुळे रस्त्यावरच प्रसूती करावी लागल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे शहरातील आरोग्य व्यवस्थेची दयनीय स्थिती पुन्हा एकदा समोर आली असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

शिरूर शहर व परिसरासह पुणे–नगर महामार्गावर वारंवार अपघात व आपत्कालीन वैद्यकीय परिस्थिती निर्माण होत असतात. अशा वेळी



तातडीने उपचार मिळण्यासाठी उपजिल्हा रुग्णालयाची नितांत गरज असल्याचेही निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे.

यावेळी नायब तहसीलदार प्रकाश मुसळे यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या प्रसंगी भाजप महिला आघाडीच्या शहराध्यक्षा प्रिया बिरादार, उपाध्यक्षा सृष्टी करंजुले, निलू शर्मा कविता परदेशी भारती शहाणे मिरा परदेशी यांच्यासह मोठ्या संख्येने महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# एकजूट राहिल्यास पेन्शन वाढीचा प्रश्न मार्गी लागेल : दहिफळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** पेन्शनधारकांना पेन्शनवाढ न झाल्यामुळे १२ वर्षांपासून अन्याय होत आहे,वपण पेन्शनधारकांनी धीर सोडू नये ,आज न उद्या आपण पेन्शनवाढ घेतल्याशिवाय राहणार नाही, त्यासाठी सर्वानी एकजूट राहिल्यास प्रश्न मार्गी लागेल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स संघटना श्रीरामपूर अध्यक्ष एस. एल. दहिफळे यांनी मेळाव्यात सांगितले.

महाराष्ट्र राज्य पेन्शनर संघटना श्रीरामपूर यांच्यावतीने साखर कामगार हॉस्पिटल सभागृह येथे संस्था कार्यकारिणी, पदाधिकारी , सभासद पेन्शनधारक , तसेच महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे जिल्ह्यातील हरेगाव, टिळकनगर, साकरवाडी लक्ष्मीवाडी येथील कामगार व पेन्शनधारक यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

शेती महामंडळ कामगारांना अत्यंत चिकाटीने प्रयत्न करून चौथा आयोग सुभाष कुलकर्णी यांनी न्यायालयीन लढे करून मिळवून दिला. तशी चिकाटी पेन्शनधारकांनी धरल्यास आज ना उद्या पेन्शनवाढ झाल्याशिवाय राहणार नाही.

सुभाष कुलकर्णी यांनी पेन्शनधारकांच्या वाढीसंदर्भात सविस्तर माहिती देऊन आपण आंदोलन किंवा अन्य मार्गाने पेन्शनवाढीचा प्रश्न जिवंत ठेवणे व पेन्शनवाढ मागणी याशिवाय आपल्यापुढे पर्याय राहिला नाही. मागील वर्षीच्या आंदोलनांमध्ये सरकारने कोणताही ठोस निर्णय घेतला नाही. आतापर्यंत बहुतांशी खासदारांनी हा प्रश्न लोकसभेत उपस्थित केला .पण त्यास केंद्र सरकार ,कामगार मंत्रालय यांचेकडून सकारात्मक निर्णय झाला नाही. पेन्शनधारकांनी संघटीपणे लढा देण्यासाठी आपण सज्ज राहावे असे प्रतिपादन सरचिटणीस सुभाष कुलकर्णी यांनी यावेळी सांगितले.

मेळाव्यात भिकन शिंदे रावळगाव, समशेर शेख बेलवंडी,भालचंद्र कोल्हटकर, अशोक पाटील, बी. ए. काळे, सुधाकर चव्हाण कारभारी त्रिभुवन, यादव खंडागळे यांनी मनोगत व्यक्त केले.

# एचपीव्ही लसीबाबत अफवावर विश्वास ठेवू नका : अतुल रासकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग व उपजिल्हा रुग्णालय गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर अंतर्गत दि. २८ एप्रिल रोजी डॉ. अभिजित खंदारे (वैद्यकीय अधीक्षक गंगापूर) यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिहा रुग्णालय गंगापूर येथे किशोरवयीन मुलींचे एचपी व्ही लसीकरण व जनजागृती करण्यात आलेली होती. तसेच त्यासाठी अतुल रासकर (रुग्ण कल्याण समिती) यांनी वैयक्तिक रित्या स्थानिक रहिवाशांन मध्ये जनजागृती केली त्याच फळ म्हणून स्वतःहून स्थानिक नागरिक पुढे येऊन लसीकरणा साठी तयार होत आहेत. आज ही एक स्थानिक गृहस्थ आपल्या किशोरवयीन मुलीला उपजिल्हा रुग्णालयात घेऊन आले आणि एचपी व्हीलस त्यांनी घेतली आहे. डॉ. अभिजित खंदारे यांनी प्रत्येक



मुलींनी लस का घेणे आवश्यक आहे. याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले, तसेच आपल्या नातलगातील इतर मुलींना सुद्धा प्रोत्साहन करावे अशी आव्हानं केले, आणि सर्वात महत्वाचे कोणत्याही अफवावर विश्वास ठेवू नये स्थानिक नागरिकांना या संबंधी काहीही शंका कुशंका असेल तर त्यांचे निरंसरण करण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय गंगापूर आणि सर्व अधिकारी कर्मचारी त्यांच्या साठी सदैव उपलब्ध असतील याचा विश्वासाने आश्वासन दिले, तसेच आपल्या गंगापूर शहरातील प्रत्येक किशोरीवयीन मुलींनी लस घेण्याचे आवाहन करण्यात आले.

तसेच या कार्यक्रम दरम्यान लाभार्थ्यास एचपीव्ही वॅक्सिन देऊन यशस्वी रित्या लसीकरण करण्यात आले, या वेळी मेट्रॉन जयश्री कुलकर्णी, अर्बन ए एन एन बेबी शेख आणि साधना गवई , रंजना कांबळे मॅडम, आरोग्य सेवक प्रविण क्षिरसागर, अजय रासकर,माधुरी रासकर एचपीव्ही लस घेतली अशी कस्तुरी रासकर सह इतर उपस्थित होते.

सध्या समाजमाध्यमांवर एचपीव्ही लसीबाबत विविध अफवा पसरवल्या जात असून त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. मात्र, नागरिकांनी अशा अपप्रचारावर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत आरोग्य विभागाच्या माहितीलाच प्राधान्य द्यावे, असे आवाहन रुग्ण कल्याण समितीचे अतुल रासकर यांनी केले आहे.

## निधन वार्ता

### चंद्रकांत खांदे



**राहुरी :** तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील शेटेवाडी परिसरातील चंद्रकांत उर्फ गोरख अण्णासाहेब खांदे (वय- ४२) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा मुलगी, भाऊ, दोन बहिणी, पुतणे, भावजय असा मोठा परिवार आहे. सुरेश खांदे यांचे ते बंधू होत.

### जेष्ठ व्यापारी मोहनलाल चोरडिया



**नेवासा** येथील प्रसिद्ध व्यापारी उद्योजक मोहनलाल मोतीलाल चोरडिया (वय ८८) यांचे वृद्धापकाळाने रविवारी दि.२६ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास निधन झाले. चोरडिया यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले,सूना,नातवंडे असा परिवार आहे. उद्योजक मंगेश चोरडिया,नितीन चोरडिया,प्रमोद चोरडिया यांचे ते वडील होते.

### सुरेश पटारे



**राहुरी** शहरातील व्यावसायिक भाजीपाल्याचे आडत व्यापारी सुरेश (भाऊ) रंगनाथ पटारे (वय ६२) यांचे नुकतेच अकस्मात निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, तीन मुली, जावई, दोन भाऊ असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने अनेकांनी हळहळ व्यक्त केली आहे. ते अत्यंत मनमिळाऊ व धार्मिक स्वभावाचे होते.

### गयाबाई उंडे



**राहुरी :** येथील जुन्या पिढीतील गयाबाई गणपतराव उंडे, (वय ८३) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा पाच मुली सुन, नातवंडे असा मोठा परिवार असून राहुरी नगरपरिषदेचे विरोधी पक्ष नेते व ज्ञानेश्वर चित्रमंदिरचे मालक चंद्रकांत उर्फ राजेंद्र ऊंडे यांच्या त्या मातोश्री असून राहुरी नगर परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते शिवाजीराव उर्फ दादा पाटील सोनवणे यांच्या त्या सासूबाई होत.

### सौ. उज्वला सोनवणे



**श्रीरामपूर :** कापूसवाडगाव येथील कुंभार समाजातील कार्यकर्ते प्रगत बागायतदार बबनराव नामदेवराव सोनवणे यांच्या पत्नी सौ.उज्वला बबनराव सोनवणे यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी अल्प आजाराने सोमवार दि. २७ एप्रिल राजी सायंकाळी ६ .१५वाजता निधन झाले. त्यांच्या मागे पती बबनराव सोनवणे, मुले, मुली असा मोठा परिवार आहे.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME
SHAIKH SHAHENAJ GULAB
( BEFORE NAME )
TO NEW NAME AS
SHAINAJ MASTAN SHAIKH
(AADHAR NO. 8524 5367 3568)
FROM VIDE AFFIDAVIT
BEFORE NOTARY PUBLIC
PIMPALGAON FUNGI
PLACE: PIMPALGAON FUNGI
DATE : 28/04/2026

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME
BASKAN BALAM SHAIKH
( BEFORE NAME )
TO NEW NAME AS
BAKSHAN BALAM SHAIKH
(AADHAR NO. 7206 8261 0347)
FROM VIDE AFFIDAVIT
BEFORE NOTARY PUBLIC
SHRIRAMPUR
PLACE: SHRIRAMPUR
DATE : 28/04/2026

## नशिबाची परिक्षा

**मंगळवार दि.२८ एप्रिल २०२६**

**मिलनम डे**
उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १५६<br>२४६<br>६६० | २-९ | १२६<br>४६०<br>९०० | जोड<br>२१-३०-७४-५८-९० |

**कल्याण**
उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १३०<br>५९०<br>७७० | ४-२ | १२९<br>४८०<br>२२८ | जोड<br>४०-६२-५३-७१-२९ |

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १४६<br>४६०<br>३७० | ०-३ | १२०<br>६७०<br>५८० | जोड<br>०७-४३-२१-९८-३५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द•ख•ल

## यशस्वी होण्यासाठी योग्य पर्याय निवडा : प्रा.एकनाथ होले

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील नेप्ती येथील श्री. स्वामी आण्णा हजारे शिक्षण संस्थेच्या नेप्ती विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी दहावीनंतर पुढे काय? या विषयावर करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बोर्ड परीक्षा होऊन जवळपास एक महिना उलटला असून निकाल लवकरच जाहीर होणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये पुढील वाटचालीबाबत उत्सुकता निमर्ाण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला अशी माहिती रामदास फुले यांनी दिली. कार्यक्रमात प्रा. एकनाथ होले यांनी विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक पर्यायांची सविस्तर माहिती देत योग्य निर्णय घेण्याचे महत्त्व पटवून दिले. दहावीनंतर अकरावी सायन्स, कॉमर्स, आर्ट्स, आयटीआय, डिप्लोमा तसेच विविध कॉम्प्युटर कोर्सेस असे अनेक पर्याय उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आवडीनिवडी, क्षमता आणि भविष्यातील ध्येय लक्षात घेऊन शाखा निवडावी. यशस्वी होण्यासाठी योग्य पर्याय निवडा असे प्रतिपादन प्राध्यापक एकनाथ होले सर यांनी केले.

## घोसपुरीत डॉ. आंबेडकर जयंती महोत्सवाचे भव्य आयोजन.

**अहिल्यानगर :** घोसपुरी ग्रामस्थांच्या सहकार्याने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भव्य जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन, संविधानकर्ते युवा प्रतिष्ठान यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात विविध वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांद्वारे महापुरुषांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात गुरुवार, दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता 'बुद्धवंदना'ने होणार आहे. सकाळी १० ते ११ या वेळेत धम्मदेशना, धम्मपूजन, ध्वजारोहण तसेच धार्मिक व सामाजिक विषयांवर मान्यवरांचे मनोगत होणार आहे. यानंतर दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होणार असल्याची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. सायंकाळी ८ ते ९ या वेळेत 'समाज प्रबोधन विचारमंथन' या कार्यक्रमांतर्गत प्रख्यात वक्ते मा. श्री. शिवव्याख्याते अभय गुलाबराव जावळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तसेच रात्री ९ वाजता सर्वांसाठी सहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.

## 'अतिवृष्टीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवले'

**एरंडगाव :** २८ सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या विहिरींसह मोठे नुकसान झाले होते. मात्र, या नुकसानी संदर्भातील उशिरा गेलेल्या ढासळलेल्या विहिरींचे पंचनाम्यांच्या प्रस्ताव अद्याप जिल्हाधिकारी कार्यालयाने स्वीकारलेल्या नसल्याची बाब समोर आली आहे.

संबंधित जिल्हा अधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांनी पंचनामा केलेले प्रस्ताव उशिरा प्राप्त झाल्याचे कारण दिले आहे. व उशिरा प्राप्त झालेले प्रस्ताव नाकारले असल्याचे समजते. त्यामुळे सदरील प्रस्ताव हे शेवगा पंचायत समितीत हे पडून आहेत . यामुळे अतिवृष्टी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे यांनी कामात दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून शिस्तभंग कारवाईची मागणी केली आहे. लवकरच या संदर्भात ते पत्र व्यवहार करणार असल्याचेही सांगण्यात येते.या अतिवृष्टीमुळे नदीकाठच्या अनेक गावांचे मोठे नुकसान झाले होते. विशेषतः ढोरा नदी काठाचे जोहरापूर गावाचे प्रस्ताव वेळेत सादर न झाल्यामुळे ते अद्याप पंचायत समितीकडे पडून असल्याचे समजते. परिणामी, या गावातील शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले आहेत.

## राजस्व स्पीड स्केटिंग स्पर्धा उत्साहात

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील आधुनिक २०० मीटर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटिक स्केटिंग रिंकवर प्रथमच आयोजित करण्यात आलेली राजस्व स्पीड स्केटिंग स्पर्धा २०२६ उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडली. संध्याकाळच्या आकर्षक वातावरणात झालेल्या या स्पर्धेने जिल्ह्यातील स्केटिंग क्षेत्राला नवी दिशा दिली.

या भव्य स्पर्धेचे आयोजन राजस्व स्पोर्ट्स क्लबचे संस्थापक तथा अध्यक्ष चेतन शहाणे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते. स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन टीम टॉपर्स स्केटिंग अॅकॅडमीचे मुख्य मार्गदर्शक व आंतरराष्ट्रीय स्केटिंगपटू प्रशांत पाटोळे यांनी केले.

स्पर्धेमध्ये विविध वयोगटांतील खेळाडूंनी शानदार कामगिरी करत प्रेक्षकांची मने जिंकली. मुलांच्या गटात सोहम शिंदे, कार्तिक नान्नावरे, जय भंडारी, विआन मुथा आणि विआन पितळे यांनी दमदार प्रदर्शन केले. यामध्ये सोहम शिंदे याने सुवर्णपदक पटकावत विशेष लक्ष वेधून घेतले.

तर मुलींच्या गटात ईश्वरी आव्हाड, श्रीनिधी गायकवाड, सई नागरे, सिद्धी घोडेस्वर आणि राजनंदिनी कांडेकर यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदकांची कमाई केली.

वरील सर्व खेळाडू राजस्व स्पोर्ट्स क्लब, सावेडी तसेच टीम टॉपर्स स्केटिंग अॅकॅडमी, बुरुडगाव रोड व वाडियापार्क येथे नियमित सराव करतात. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे हे यश मानले जात आहे.

### तलाठीने बोगस वारस फेरफार नोंद केल्याप्रकरणी

# जामखेड तहसीलसमोर माकुडे कुटुंबीयाचे उपोषण सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील नान्नज येथील गट नंबर ११२८ मध्ये मयत सिताराम पांडुरंग माकुडे यांच्या हिश्याची असलेली जमीन हनुमान माकुडे, संजय माकुडे, मिठु माकुडे या तिघांचे ते चुलते असुन यांना कळत असल्यापासून त्यांची जमीन यांच्या कडेच आहे तसेच चुलता मयत सिताराम माकुडे यांचा पहिल्या पासुन यानींच सभांळ केलेला आहे चुलत्याचा अंत्यविधी पर्यंत चा सर्व धार्मिक विधी त्यांचे पालन पोषण दुख व दवाखाना सेवा सर्व त्यांची सेवा त्यांचे पुतणे यांनीच केलेला आहे चुलता मयत. सिताराम माकुडे यांचा विवाह कधीही झाला नव्हता ते अविवाहित होते त्यामुळे त्यांचे कायदेशीर वारस आम्ही तीनच पुतणे आहे नान्नज चे तलाठी प्रितम खाडे यांनी कोर्ट कडुन वारस प्रमाणपत्र घेऊन नोंद लावणे आवश्यक असताना तसेच चावडीवर नोटीस डकावणी करणे गरजेचे असताना तसेच त्यांचे वारसा बाबत चौकशी करणे गरजेचे असताना तस न करता खोटे बेकायदेशीर व नावात समानता असलेले बाहेर गावातील लोंकाची सदर मिळकत गट ११२८ या मिळकतीस बेकायदेशीर बोगस पोकळीस्त अशी नोंद बेकायदेशीर पैसे घेऊन लावलेली आहे

चुलता मयत सिताराम माकुडे यांचे स्थावर मालमत्तेचे वारस प्रमाणपत्र कुठेही तयार करण्यात आलेले नाही तसेच नान्नज चे ग्रामविकास अधिकारी पवार यांनी चुलत्याचे नान्नज ग्रामपंचायत मधून दोन वेगवेगळ्या तारखेचे मृत्यूचे प्रमाणपत्र उपलब्ध करून दिलेले आहे त्या मुळे चुलता मयत सिताराम माकुडे यांच्या नावावरील जमीन वारसा हक्काने लावताना नान्नज गावचे तलाठी प्रतिम खाडे व ग्रामविकास अधिकारी जी. एस. पवार, तसेच मंडळ अधिकारी इकडे या सर्वानी संगनमताने वारस फेरफार नोंदीचा बेकायदेशीर दस्तऐवज तयार करण्यास मदत करून चुकीच्या पध्दतीने वारस फेरफार नोंदी केलेल्या असुन पदाचा गैरवापर केलेला आहे. जामखेड च्या तहसील कार्यालय येथे झालेले प्रतिज्ञापत्र हे पण खोटे असुन प्रतिज्ञापत्र वर सही करताना जामखेड तहसील कार्यालयातील




अधिकाऱ्याला पण हाताशी धरून प्रतिज्ञापत्रावर लिहिलेले सर्व व्यक्ती हजर नसतांनाही प्रतिज्ञापत्रावर पदाचा गैरवापर करून जामखेड तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांने भ्रष्ट मार्गाने सही केली आहे तरी वरील सर्व प्रकरणाची आपल्यास्तारावरून सखोल चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी व बोगस बेकायदेशीर वारस नोंद घेतलेला फेरफार रद्द करून मिळावा व मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, तहसील कार्यालयातील प्रतिज्ञापत्रावर सही करणारे अधिकारी यांच्या वर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा यासाठी माकुडे कुटुंबीयाचे उपोषणाचा दुसरा दिवस आहे असे लेखी निवेदन दि. २७/३/२०२६ रोजी उपोषणास बसणार आहे असे लेखी निवेदन दाखल केलेले होते परंतु निवेदन दिलेले महिना झाले तरी तहसीलदार यांनी कायच कारवाई केली नाही तसेच निवेदनाची कसल्याही प्रकारे दखल घेण्यात आली नाही त्यामुळे दि. २७/४/२०२६ रोजी पासुन जामखेड तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले उपोषणकर्त्यांचा आजचा दुसरा दिवस होता तहसीलदार बांगर यांनी उपोषणकर्त्यां सोबत तोंडी चर्चा केली कि मला चौकशी करण्यासाठी पंधरा दिवस द्या मी चौकशी करतो असे तहसीलदार बांगर यांनी आश्वासन दिले नंतर उपोषण मागे घेण्यात आले .

## 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचे हुंडेकरी परिवाराच्या वतीने स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरात 'गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रा २०२६' चे उत्साहपूर्ण वातावरणात आगमन झाले. या यात्रेचे हुंडेकरी परिवाराच्या वतीने स्वागत करण्यात आले.

यात्रेसाठी आवश्यक असलेली जागा उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या हुंडेकरी परिवाराने पुन्हा एकदा आपली सेवाभावी परंपरा अधोरेखित केली. यात्रेच्या सोयीसाठी 'हुंडेकरी लॉन' उपलब्ध करून दिल्याबद्दल माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते हाजी करीम शेठ हुंडेकरी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला उपमहापौर धनंजय जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हुंडेकरी परिवाराच्या वतीने दरवर्षी नाशिकहून सायकलवरून येणाऱ्या आषाढी वारी यात्रेचेही स्वागत करुन संपूर्ण व्यवस्था पाहिली जाते. या जलयात्रेच्या निमित्ताने शहरात धार्मिक एकात्मता आणि सामाजिक सहकार्याचे उत्तम उदाहरण पाहायला मिळाले.

डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, 'गोदा ते नर्मदा' ही जलयात्रा शहरांच्या जलसमृध्दीसाठी महत्त्वाचे पाऊल आहे. सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारी ही यात्रा आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजासाठी कार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हुंडेकरी परिवाराने यात्रेसाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

हाजी करीमशेठ हुंडेकरी म्हणाले की, आमच्या परिवाराला सामाजिक कार्यात सहभागी होण्याची संधी मिळते, हे आमचे भाग्य आहे. यात्रेकरूंना सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची जबाबदारी समजून आम्ही काम करतो. आषाढी वारी असो किंवा जलयात्रा प्रत्येक उपक्रमात आम्ही भाविकांची सेवा करण्याचा प्रयत्न करतो. पुढेही अशी सेवा सुरू ठेवण्याचा आमचा संकल्प असल्याचे ते म्हणाले.

## रस्ते पीडित शेतकऱ्यांसाठी समन्वय बैठक

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील गावनकाशाप्रमाणे अतिक्रमित व बंद झालेले शिवरस्ते, गाडीरस्ते, पाणंद रस्ते, पायवाटा तसेच शेतात जाण्याचे मार्ग मोकळे करण्याच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण समन्वय बैठक आयोजित करण्यात आली आहे.

ही बैठक तहसीलदार . सचिन डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच शिवपानंद शेत/पाणंद रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक . दादासाहेब जंगले पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. दिनांक: ३० एप्रिल २०२६ वेळ: सकाळी ११:०० वाजता स्थळ: तहसीलदार कार्यालय, श्रीगोंदा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचे शेतरस्ते अतिक्रमणामुळे बंद झाले असून शेतीकाम, पिकांची वाहतूक, जनावरांची ने-आण आणि दैनंदिन हालचालींमध्ये मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. तालुक्यातील सर्व रस्तेपीडित शेतकऱ्यांनी ७/१२, फेरफार, गावनकाशा, जुने रस्ते पुरावे, अर्ज, तक्रारी व इतर आवश्यक कागदपत्रांसहित उपस्थित राहावे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी ही सुवर्णसंधी असून प्रत्येक बाधित शेतकऱ्याने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे.

## जिल्हा न्यायालयासमोर सुरु केलेले काते कुटुंबाचे उपोषण मागे

### अॅड.सुरेश लगड यांची मध्यस्थी

**अहिल्यानगर :** जिल्हा न्यायालयाच्या सेशन कोर्टाने दिलेल्या निकालाविरोधात अन्याय झाल्याचा आरोप करत भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष साहेबराव काते यांनी आपल्या कुटुंबीयांसह जिल्हा न्यायालयाच्या प्रवेशद्वारासमोर बेमुदत उपोषण केले. यावेळी विशेष सरकारी वकील अॅड. सुरेश लगड यांनी उच्च न्यायालयात दाद मागून न्याय मिळवणार असल्याचे स्पष्ट करुन काते परिवाराचे उपोषण लिंबू पाणी देऊन सोडविले.

यावेळी अॅड आनंद सुर्यवंशी, भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी यांच्यासह उपोषणकर्ते सुशिला काते, अनिता जाधव, रेखा भोगले, श्रद्धा काते, आराधना भोगले, अंकिता भोगले, राणी जाधव, सिताबाई रोकडे आदी उपस्थित होते.

काते यांनी निवेदनात म्हटले आहे की, ते सामाजिक कार्यकर्ते असून भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ता म्हणून काम करतात. त्यांच्या मुलगा राजू साहेबराव काते याच्याविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात ११ नोव्हेंबर २०२१ रोजी एका महिलेने अत्याचाराचा गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी या प्रकरणात तपास करून न्यायालयात आरोपपत्र



दाखल केले. या प्रकरणात न्यायालयाने १२ मार्च २०२६ रोजी राजू काते यास दोषी ठरवत १० वर्षे सक्त मजुरी व दंडाची शिक्षा सुनावली. मात्र, हा निकाल वस्तुस्थितीचा योग्य विचार न करता देण्यात आल्याचा गंभीर आरोप काते यांनी केला आहे.

काते यांच्या मते, संबंधित महिलेने सुरुवातीला रुग्णालयात उपचारादरम्यान अनोळखी व्यक्तीने अत्याचार केला असे सांगितले होते, अशी नोंद वैद्यकीय कागदपत्रांत आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी तिने कथितरीत्या नाव बदलून राजू काते याच्यावर आरोप केला. यामुळे संपूर्ण प्रकरण संशयास्पद असल्याचा दावा त्यांनी केला. या अन्यायाच्या विरोधात आणि या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याच्या मागणीसाठी जिल्हा न्यायालयाच्या गेटसमोर कुटुंबीयांसह बेमुदत आमरण उपोषण करुन निवेदन राष्ट्रपतींना पाठविण्यात आले.

## श्रीगोंद्यात खरीप हंगाम पूर्व नियोजन आढावा बैठक संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा व अहिल्यानगर तालुक्याच्या खरीप हंगाम पूर्व नियोजनाचा आढावा घेण्यासाठी माऊली सभागृह, श्रीगोंदा येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी आ. विक्रमदादा पाचपुते होते.

बैठकीदरम्यान श्रीगोंदा तालुका कृषी अधिकारी सौ. क्रांती चौधरी यांनी खरीप हंगामाच्या नियोजनाबाबत सविस्तर सादरीकरण केले. यामध्ये खत व बियाणे पुरवठा, विविध मोहीमांद्वारे विस्तार कार्य, तसेच अलनीनोच्या पार्श्वभूमीवर पिकांचे नियोजन व पाणी व्यवस्थापन यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांचा आढावा घेण्यात आला.

तसेच अहिल्यानगर तालुका कृषी अधिकारी अशोक वाळके यांनी अहिल्यानगर तालुक्याच्या खरीप हंगाम नियोजनाबाबत माहिती देत संबंधित उपाययोजना स्पष्ट केल्या.

यावेळी आ. विक्रमदादा पाचपुते यांनी शेतकऱ्यांसाठी खत वितरणाचे काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. तसेच अलनीनोच्या पार्श्वभूमीवर उद्भवणाऱ्या परिस्थितीकडे संकट म्हणून न पाहता संधी म्हणून पाहण्याचे आवाहन करत आगामी खरीप हंगामासाठी सर्व शेतकऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

सभेदरम्यान पुरस्कारप्राप्त शेतकरी मारुती डाके (उदयनपंडित) व पिक स्पर्धा विजेते शेतकरी राजेंद्र कसरे (भानगाव) यांचा आ. पाचपुतेंच्या हस्ते रोपटे देऊन सत्कार करण्यात आला.




या बैठकीस सर्व मंडळ कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (पंचायत समिती), विविध विभागांचे प्रमुख तसेच अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदकुमार घोडके (इढच्, आत्मा) यांनी केले, तर आभार प्रदर्शन मनोज सूर्यवंशी (कृषी अधिकारी, गुण नियंत्रण) यांनी केले. उत्कृष्ट PPT सादरीकरण व छायाचित्रणाचे कार्य सहाय्यक कृषी अधिकारी प्रतीक कांबळे यांनी पार पाडले.

## कायदेविषयक मोफत मदत केंद्रामुळे सर्वसामान्यांना न्याय : न्यायाधीश पैठणकर

**अहिल्यानगर :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,अहिल्यानगर यांच्या अंतर्गत, मुंबई येथील इंटरनॅशनल जस्टिस मिशन यांच्या सहयोगाने तसेच बीपीएचई सोसायटीच्या सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था, अहिल्यानगर द्वारे संचलित मोफत कायदेविषयक मदत चिकित्सालयाचे उद्घाटन नुकतेच सीएसआरडीमध्ये पार पडले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव न्यायाधीश योगेश पैठणकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते तर बीपीएचई सोसायटीचे सचिव विशाल बार्नबस हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते, यावेळी मंचावर इंटरनॅशनल जस्टिस मिशनच्या अधिवक्ता ड. हॅलिना थोरात, वरिष्ठ सहयोगी



निलेश छडीदार व सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास महिला, बालक व दुर्बल घटकांच्या कार्यरत असणारे विविध शासकीय कार्यालयांचे अधिकारी, संस्थां व संघटनाचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला डॉ. सुरेश पठारे यांनी प्रास्ताविकातून या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, मोफत कायदेविषयक मदत केंद्र हे केवळ सेवा देणारे केंद्र नसून, ते सामाजिक न्याय आणि जनजागृतीचे एक प्रभावी व्यासपीठ असणार आहे, यासाठी सर्वच यंत्रणांचा संवाद व समन्वय गरजेचा असणार आहे. समाजातील वंचित, दुर्बल आणि न्यायप्रवेशापासून दूर असलेल्या घटकांना सुलभ व मोफत कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला असून, यामुळे न्यायप्रवेश अधिक व्यापक आणि प्रभावी होणार असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले.

यावेळी एम.एस.डब्ल्यू. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गरज मूल्यांकन अहवालातून समाजातील विविध घटकांना भेडसावणाऱ्या कायदेविषयक समस्यांचे वास्तव चित्र समोर आले. या अहवालामुळे या केंद्राच्या कार्याची दिशा निश्चित होण्यास मदत होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सॅम्युअल वाघमारे यांनी केले तर आभार वैशाली पठारे यांनी मानले. सीएसआरडीचे डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ.जेमोन वर्गीस,डॉ. विजय संसारे, डॉ.प्रदीप जारे, आसावरी झपके, नाजीम बागवान, ट्विंकल ईश्वरी तसेच विद्यार्थ्यांनी सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## आल्हाट यांना 'पद्मश्री डॉ. देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार २०२६' प्रदान

**अहिल्यानगर :** येथील कवयित्री, सामाजिक कार्यकर्त्या व मुक्त पत्रकार सरोज आल्हाट यांना भारत सरकारच्या नीती आयोग संलग्नित डॉ. मणिमाई देसाई प्रतिष्ठान व आरोग्य सेवा संस्थेच्या वतीने प्रतिष्ठेचा 'पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. हा सन्मान त्यांना त्यांच्या बहुआयामी योगदानाबद्दल देण्यात आला आहे. पुणे येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह येथे पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी खादी व ग्रामोद्योग मंत्री रवींद्र साठे यांच्या हस्ते आल्हाट यांचा सन्मान करण्यात आला.

# जय मल्हार विद्यालयात शिक्षणाची डिजिटल प्रणाली येणार!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

### सचिव अॅड.पांडुरंग गायकवाड यांचा संकल्प

**अहिल्यानगर :** पिंपळगाव रोठा येथील जय मल्हार विद्यालयात विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम गणपत सुंबरे यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ २६ एप्रिलला विद्यालयात संपन्न झाला.यावेळी संस्थेचे सचिव ड.पांडुरंग गायकवाड यांनी पुढील शैक्षणिक वर्षामध्ये जय मल्हार विद्यालयाच्या नवीन इमारतीमध्ये ग्रामीण भागातील गोरगरीब मुलांना, मुलींना डिजिटल शिक्षण देण्याचा संकल्प जाहीर केला.

या कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून अहिल्या नगरचे माजी शिक्षणाधिकारी दिलीपराव थोरे , ज्ञानदाता शिक्षण संस्था ठाणेचे अध्यक्ष सुनील फापाळे यांनी आपल्या भाषणाने श्रोत्यांना प्रोत्साहित केले.सुंबरे सर यांच्या बद्दल त्यांनी आठवणी सांगितल्या. यावेळी मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुनील पंडित हे उपस्थित होते. तालुक्यातील प्रमुख प्राचार्य, मुख्याध्यापक,शिक्षक,पाहुणे, नातेवाईक,ग्रामस्थ,पालक याप्रसंगी उपस्थित होते .

यावेळी बोलताना अॅड. गायकवाड म्हणाले की, शहरी भागातील मुलांची स्पर्धा करण्याकरता ग्रामीण,गोरगरीब मुलांना डिजिटल शिक्षण देऊन त्यांना सक्षम बनवण्यासाठी विद्यालयांमध्ये नवीन इमारत पूर्ण होत असून शाळेत यापुढे डिजिटल शिक्षण देण्यात येणार आहे. तसेच सुंबरे सरांनी पुढील काळात शिक्षण तज्ञ म्हणून शिक्षण क्षेत्रात काम करावे अशी अपेक्षाही व्यक्त केली.

प्रमुख पाहुणे थोरे यांनी यावेळी .विद्यालयाबाबतच्या काही आठवणी सांगितल्या.मुख्याध्यापक सुंबरे सर यांच्या बद्दल त्यांनी आठवणी व सकारात्मक कार्यशैली बाबत आपल्या कार्यकाळातील आठवणीना उजाळा दिला . शाळेची होत असलेली प्रगती याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुनील पंडित, मुख्याध्यापक रामराव पवार ,अशोक ठुबे , बाबासाहेब दाते सर,संगमनेर येथील संजय वाळे सर, माजी विद्यार्थी राजाराम मुंडे, पोपट सुंबरे, ग्रामस्थ जालिंदर खोसे, बाबाजी जगताप, लक्ष्मण सुंबरे यांनीही सुंबरे सर यांना आपल्या भाषणात शुभेच्छा दिल्या. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुद्धा सुंबरे सरांबद्दलच्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी मुख्याध्यापक सुदाम दळवी, राजेंद्र वाघ ,प्राचार्य संदीप मस्के , संतोष ठाणगे , वाळुंज सर, , रसाळ सर,देंडगे , सपकाळ सर ,आबासाहेब गायकवाड सर, कानूर पठार जनता विद्या मंदिरचे प्राचार्य काळे सर, नानाभाऊ भांबरे, बबन चिमाजी पुंडे, जनार्धन महाराज मुंडे,माजी उपसरपंच दादाभाऊ पुंडे,तंटामुक्ती अध्यक्ष गोपीनाथ घुले,धोंडीभाऊ शेठ जगताप, गोरख जगताप, शंकर गायकवाड,किसन मुंडे,शांताराम खोसे, खंडू सुपेकर, दादाभाऊ नरवडे, बाबाजी जगताप, भाकरे सर,रेवण सुंबरे, राजाराम सुंबरे, अशोक सुंबरे, संतोष सुंबरे उपस्थित होते. यावेळी संस्थेचे सचिव गायकवाड यांनी सुंबरे सरांचा संपत्नीक सत्कार केला. विद्यालयाकडून सर्व शिक्षक कर्मचारी स्टाफ यांच्यावतीनेही सरांचा सन्मान केला गेला. यावेळी उत्तम सुंबरे यांनी शिक्षणासाठी घेतलेल्या काबाडकष्टाच्या आठवणी सांगताना गहिवरून आले होते. याप्रसंगी शिक्षक उंडे सर यांनी अध्यक्षीय सूचना मांडली. तिला भगवंत भांबरे यांनी अनुमोदन दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गर्कळ सर यांनी केले व आभार केदारी सर यांनी मानले.

## द•ख•ल

## शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांची निवडयादी प्रसिद्ध

**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत २८ डिसेंबर २०२६ रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेची निवडयादी व गुणयादी परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in http://mecenmms.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. शिष्यवृत्ती योजना परीक्षेची (एनएमएमएस) विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांची यादी २४ फेब्रुवारी रोजी परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना, पालकांना शाळेमार्फत जात, दिव्यांगत्व जन्म दिनांक आदी बाबतची दुरुस्ती असल्यास परिषदेकडे ऑनलाईन पाठविणेबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांनी, पालकांनी शाळेमार्फत पाठविलेल्या दुरुस्त्यांचा विचार करुन शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांची निवडयादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या परीक्षेसाठी २ लाख ५० हजार ७४५ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती. या परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्यासाठी ११ हजार ६८२ शिष्यवृत्ती कोटा शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून निश्चित केलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या आरक्षणानुसार संबंधित संवर्गातील विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते, तसेच संबंधित संवर्गात दिव्यांगांसाठी ४ टक्के आरक्षण समाविष्ट आहे. सर्व जिल्ह्यांसाठी स्वतंत्रपणे ७ वी व ८ वीची विद्यार्थी संख्या व १२ ते १४ वयोगटातील संख्येच्या आधारे जिल्हानिहाय कोटा निश्चित करण्यात आलेला आहे. परीक्षेचा निकाल व निवडयादी फक्त परिषदेच्या संकेतस्थळावरच उपलब्ध करुन दिली जाते. जिल्ह्यांनी, शाळांनी व विद्यार्थ्यांनी सदरचा निकाल परिषदेच्या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावा. शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वितरणाचे काम शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षणाधिकारी (योजना) व शिक्षण संचालक (योजना) यांच्यामार्फत केले जाते, असे आयुक्त महेश चौथे यांनी कळविले आहे.

## दिवेतील (जाधववाडी ) जवानाला वीर मरण



**दिवे** : पुरंदर तालुक्यातील दिवे (जाधववाडी) येथील जवान घनश्याम रायबा आढाळगे (वय २२) यांना हिमाचल प्रदेश येथे कर्तव्य बजावत असताना वीरमरण आले. त्यांच्या अकाली निधनाने दिवे परिसरासह संपूर्ण पुरंदर तालुक्यावर शोककळा पसरली आहे. घनश्याम आढाळगे हे भारतीय सैन्यात कार्यरत होते. दोन महिन्यांपूर्वीच सुट्टी संपवून ते पुन्हा हिमाचल प्रदेश येथे सेवेत रुजू झाले होते. कर्तव्य बजावत असतानाच त्यांना वीरमरण आल्याची दुर्दैवी घटना घडली. त्यांच्या निधनाची बातमी गावात समजताच संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. अत्यंत कर्तव्यदक्ष, शांत आणि मनमिळावू स्वभावामुळे घनश्याम यांची गावात ओळख होती. त्यांच्या पश्चात आई-वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे. त्यांच्यावर बुधवार, २९ एप्रिल २०२६ रोजी जाधववाडी (दिवे), ता. पुरंदर येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. जवानाच्या वीरमरणामुळे ग्रामस्थांसह विविध स्तरांतून शोक व्यक्त करण्यात येत असून, आढाळगे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## प्रा. सोनाली वळसे (औटी) यांना पीएच.डी. पदवी



**निरगुडसर :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने मानव संसाधन व्यवस्थापन या विषयात निरगुडसरची कन्या प्रा. सोनाली प्रभाकर वळसे पाटील (औटी) यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांना संस्थात्मक संस्कृती आणि तिचा कर्मचाऱ्यांच्या बांधिलकीवर होणारा परिणाम ‘‘ (Oganizational CultuA°e and its Effect on Employees' Commitment) या संशोधन विषयपर पीएच.डी. प्रदान करण्यात आली. या संशोधनातून संस्थात्मक संस्कृतीचा कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमता, निष्ठा व बांधिलकीवर होणाऱ्या परिणामांचा सखोल अभ्यास करण्यात आला. या संशोधन कार्यासाठी त्यांना डॉ. जितेंद्र हुडे यांचे मालाचे मार्गदर्शन लाभले. सोनाली हीचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण निरगुडसर गावी झाले असून बी. फार्म पदव्युतर शिक्षण पुणे येथे झाले. सध्या मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट मध्ये संचालक पदी कार्यरत आहेत. सोनाली हीला सासर व माहेर कुटुंबीयांकडून प्रोत्साहन व पाठबळ मिळाले.

## ग्राहकांना स्पष्ट माहिती देणे बंधनकारक

**पुणे :** अन्न व औषध प्रशासन यांनी सर्व रेस्टॉरंट, केटरर्स, हॉटेल्स व फास्ट फूड विक्रेत्यांना अन्नपदार्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या ‘‘चीज ॲनालॉग‘‘ बाबत ग्राहकांना स्पष्ट माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत. अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ नुसार ग्राहकांना अन्नातील घटकांची अचूक माहिती मिळणे आवश्यक आहे. पनीर हे शुद्ध दुधापासून तयार होते, तर चीज ॲनालॉग हे खाद्यतेल, स्टार्च व इतर घटकांपासून बनविलेले असल्याने त्याचे स्वरूप वेगळे असते. चीज ॲनालॉग वापरून तयार केलेल्या पदार्थांची माहिती बिलावर नमूद करणे बंधनकारक आहे. मेन्यू कार्ड, इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्डवर स्पष्ट उल्लेख आवश्यक आहे. उत्पादक व पुरवठादारांनी विक्री बिलावर ‘‘डेअरी/चीज ॲनालॉग‘‘ असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. ॲनालॉग हा आरोग्यास अपायकार नाही, परंतु त्यातील घटक व पोषणमुल्ये पनीरपेक्षा वेगळी असतात. त्यामुळे ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी योग्य माहिती असे आवश्यक आहे. ग्राहकांनी पॅकबंद उत्पादनावरील लेबल तपासावे, सुटे पनीर खरेदीवेळी खात्री करून बिल घ्यावे. हॉटेलमध्ये पनीर व चीज ॲनालॉग स्वतंत्र नमूद आहे का ते पाहावे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या उत्पादक, पुरवठादार व खाद्य व्यवसायिकांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार आहे. पुणे विभागातील रेस्टॉरंट/केटरर्स/हॉटेल्स/फास्ट फुड विक्रेते तसेच चीज ॲनालॉगचे उत्पादक/पनीरचे उत्पादक/पुरवठादार यांनी कायदयातील तरतुदीचे उल्लंघन केल्याचे आढळ्यास त्यांच्यावर प्रशासनामार्फत अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६, नियम व नियमने अंतर्गत संबंधितांवर कठोर कारवाई घेण्यात येईल. तसेच ग्राहकांनी अशा प्रकारची दिशाभूल झाल्यास त्याबाबत तक्रार प्रशासनाच्या १८००-२२२-३६५ या टोल फ्री क्रमांकावर नोंदवावी असे आवाहन दिगंबर भोगावडे, सह आयुक्त (अन्न), अन्न व औषध प्रशासन, पुणे यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन द्यावे-कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

### बियाणे उत्पादक कंपनी, वितरक आणि विक्रेत्यांची खरीप हंगामपूर्व राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** एल-निनोच्या पार्श्वभूमीवर यावर्षी सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन द्यावे. दुबार पेरणीची वेळ आल्यास शेतकऱ्यांना बियाण्यांची टंचाई भासणार नाही, यादृष्टीने मुबलक प्रमाणात बियाण्यांची साठवूक करावी, असे निर्देश राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. सर्व बियाणे उत्पादक, वितरक, विक्रेत्यांनी समन्वयाने कामे करावे, या उद्देशाने राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, असेही ते म्हणाले. शिरनामे सभागृह, कृषी महाविद्यालय येथे आयोजित बियाणे उत्पादक कंपनी, वितरक आणि विक्रेत्यांची खरीप हंगामपूर्व राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, कृषी आयुक्त सुरज मांढरे, महासंचालक राहूल माहिवाल, राष्ट्रीय सूचना केंद्राचे वरिष्ठ संचालक अविनाश पेडगावकर, संचालक विस्तार व प्रशिक्षण रफीक नाईकवाडी,




संचालक निविष्ठा व गुणनियंत्रण सुनील बोरकर, महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेचे संचालक अंबादास मिसाळ, कृषी उपसंचालक बियाणे व नोडल अधिकारी साथी डॉ. प्रिती सवाईराम, यांच्यासह सियाम, मासा व माफदा बियाणे उत्पादक, विक्रेते संघटनेचे प्रतिनिधी, बियाणे उत्पादक, वितरक आणि विक्रेते उपस्थित होते. ॲड. जयस्वाल म्हणाले, महाराष्ट्र राज्याने देशाला दिशा देण्याचे काम केले आहे. त्यामुळे सर्वांनी मिळून विकसित महाराष्ट्र २०४७ च्या संकल्पपूर्तीच्यादृष्टीने काम करावे. बोगस बियाण्यांवर आळा घालून शेतकऱ्यांना उच्चप्रतीचे बियाणे उपलब्ध करुन देण्याकरिता साथी पोर्टलचा वापर करावा, असे ॲड. जयस्वाल म्हणाले.

श्री. मांढरे म्हणाले, उच्च उत्पादनक्षम वाणांचा वापर, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यामुळे देशाच्या बियाणे उत्पादनामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. याकरिता साथी पोर्टल हे महत्वपूर्ण पाऊल असून यामुळे उत्पादक व विक्रेत्यांना कायदेशीर अडचणीच्यावेळी पुरावा म्हणून ते उपयोगी पडणार आहे. तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करण्यावर भर द्यावा, असेही श्री. मांढरे म्हणाले. श्री. बोरकर प्रास्ताविकात म्हणाले, केवळ उच्चतम प्रतीच्या बियाण्यांमुळे पीक उत्पादनात २० टक्के पर्यंत वाढ होऊ शकते. शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे व दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनाने साथी पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलची अंमलबजावणी खरीप हंगाम २०२३ पासून करण्यात आली आहे. बियाणे उत्पादक व विक्रेत्यांच्या संघटनेच्या सूचनेनुसार पोर्टलमध्ये आवश्यतेप्रमाणे बदल करण्यात आले असून पोर्टलच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे, असेही श्री. बोरकर म्हणाले. यावेळी डॉ. प्रिती सवाईराम यांनी साथी पोर्टलची उद्दिष्टे, उपयोगिता, पोर्टलमध्ये उत्पादक, विक्रेत्यांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा आदीबाबत मार्गदर्शन केले. श्री .पेडगावकर यांनी पोर्टलचा वापर करतांना येणाऱ्या तांत्रिक अडचणीचे निराकरण करण्यात केले. तंत्र अधिकारी अनिल महामुलकर यांनी बियाणे कायद्यातील तरतुदी व बिटी कॉटन बाबत मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते साथी पोर्टल मार्गदर्शक पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.

## गावागावांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार ; शिरुर पोलीस स्टेशनमध्ये बैठकीचे आयोजन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरुर:** शिरूर पोलीस स्टेशन येथे २७ एप्रिल रोजी दुपारी १२:३० वाजता शिरूर पोलीस स्टेशन हद्दी मधील पोलीस पाटील यांची सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीमध्ये गावांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यावर चर्चा करण्यात आली. सर्व पोलीस पाटील यांना सीसीटीव्ही कॅमेरे लोक सहभागातून आणि ग्रामपंचायतीच्या मदतीने जास्तीत जास्त संख्येत बसवण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यासाठी शिरूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री महेश डोके यांच्याशी समक्ष संवाद साधण्यात आला. त्यांनी आश्वासन दिले की गावांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या कामाला तात्काळ प्रारंभ केला जाईल. त्याचप्रमाणे, यावर तात्काळ कारवाई सुरू करण्यात येईल अशी माहिती दिली आहे. शिरूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांच्या माध्यमातून गावांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू केली जाईल. लोकसहभागातून व ग्रामपंचायतीच्या मदतीने जास्तीत जास्त कॅमेरे बसवले जातील. या बैठकीमधून गावांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची प्रक्रिया प्रारंभ करण्यात आली आहे, तसेच सर्व संबंधित यंत्रणांना यावर कार्यवाही करण्यास सांगितले आहे. यामुळे गावांमध्ये सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम होईल अशी अपेक्षा आहे.

## सुपा एमआयडीसी चौकातील हायमास्ट दिवा ६ महिन्यांपासून बंद प्रशासनाविरोधात संताप, सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सुपा :** सुपा एमआयडीसी (औद्योगिक क्षेत्र) चौकातील मुख्य हायमास्ट दिवा गेल्या सहा महिन्यांपासून बंद अवस्थेत असून, या गंभीर समस्येकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने स्थानिक नागरिक, कामगार आणि उद्योजकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रात्रीच्या वेळी हा चौक पूर्णतः अंधारात जात असल्यामुळे चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचीही भीती व्यक्त केली जात आहे. या हायमास्ट दिव्याची लाईट पूर्णपणे नादुरुस्त असून, त्याचे इलेक्ट्रिकल पॅनेलही उघड्या अवस्थेत असल्याचे दिसून येते. त्यामुळे अपघाताचा धोका देखील वाढला आहे. विशेष म्हणजे, हा चौक एमआयडीसी परिसरातील मुख्य वर्दळीचा मार्ग असून, अनेक कामगारांना रात्री व उपरात्री या ठिकाणाहून कंपनीत ये-जा करावी लागते. मात्र अंधारामुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. काही महिन्यांपूर्वी काही दैनिका मध्ये याबाबत बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती, तरीही प्रशासनाने अद्याप याची दखल घेतलेली नाही, हे विशेष चिंतेचे आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासन उद्योजकांशी संवाद साधत असल्याचे सांगितले जात असताना, अशा मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष का केले जात आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संवाद फक्त कागदावरच का? असा रोष व्यक्त करत स्थानिकांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, त्वरित हायमास्ट दिवा दुरुस्त करून परिसरात पुरेशी प्रकाशव्यवस्था करण्यात यावी. अन्यथा संभाव्य गुन्हेगारी व अपघातांच्या घटनांना प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.




## अजितदादांच्या स्मृतीस्थळी काटेवाडीच्या जि.प. शाळेने दिली भेट..!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** जि.प. शाळा काटेवाडी येथील तब्बल १५० विद्यार्थी व सर्व शिक्षकवर्ग यांनी बारामती शहरातील विविध ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळांना भेट देत शैक्षणिक सहलीचा आनंद घेतला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्याध्यापक विठ्ठल जोरी सर यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम पार पडला. सहलीची सुरुवात सकाळी ८.३० वाजता दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतीस्थळी दर्शन घेऊन करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी ज्येष्ठ नेते शरदचंद्रजी पवार संग्रहालय (म्युझियम), गरूड बाग तसेच नटराज कला दालन या ठिकाणांना भेट देत विविध ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक बाबींची माहिती घेतली. या भेटींमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली असून, स्थानिक वारसा आणि इतिहासाची ओळख त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून झाली. दुपारी १.३० वाजता सर्व विद्यार्थी व शिक्षकांसाठी भोजनाची व्यवस्था सिद्धिविनायक फाउंडेशनचे अध्यक्ष तथा नगरसेवक गणेश जोजारे तसेच फाउंडेशनचे संघटक व वारकरी सेवा संघ बारामतीचे अध्यक्ष श्रीकांतशेठ झोरे यांच्या वतीने सोनार समाज सेवा संघ, कसबा येथे करण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने भोजनाचा लाभ घेतला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी अजितदादा पवार यांना आदरांजली वाहत आपल्या भावना व्यक्त केल्या तसेच विविध सांस्कृतिक व गुणदर्शन सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले. या प्रसंगी नगरसेवक सोमनाथ गजाकस, गोरख पारसे, विशाल हिंगणे, राजेंद्र सोनवणे, पत्रकार सुरज देवकाते, प्रतीक ढवाण, अविनाश निकाळजे तसेच सिद्धिविनायक फाउंडेशनचे सुधीर पोतदार, रघुनाथ बागडे, संजय निंबाळकर, आप्पा वाकळे, संतोष जगताप, संजय धुमाळ, अमोल जगदाळे, प्रतीक जोजारे, सोनम जोजारे, मोईन शेख, वनवे सर, विक्रम काळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. एकूणच, या शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळाले असून, त्यांच्यात सामाजिक व सांस्कृतिक जाणीवा वृद्धिंगत होण्यास मदत झाली.

# ग्रामपंचायत पोटनिवडणूकांसाठी विशेष मनाई आदेश लागू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :**जिल्ह्यातील ग्रामपंचायतीतील सदस्य थेट सरपंच यांच्या निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त जागांच्या पोट निवडणुकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात येणारा प्रत्यक्ष निवडणुक कार्यक्रम जाहीर झालेला आहे. दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी मतदान व दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी मतमोजणी पक्रिया पार पडणार आहे. मतदान शांत, निर्भय व निःपक्षपाती वातावरणात पार पडावे आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी डॉ. शशिकांत महावरकर, पोलीस सह-आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी नागरीक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील ०३ ग्रामपंचायतीची निवडणुक होणार असून, त्यामध्ये १) दक्षिण चाकण पोलीस स्टेशन (बहुळ) २) दक्षिण महाळुंगे पोलीस




स्टेशन (निघोजे) ३) शिरगाव पोलीस स्टेशन (गोडुंब्रे) या ग्रामपंचायतीचे हद्दीत दि.२८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ०५.०० वा. पासुन खालील कृत्यास मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. हे आदेश पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील निवडणुक प्रक्रीया (मतदान) राबविण्यात येणार असणारे संबंधित ग्रामपंचायत निवडणुक कार्यक्षेत्रात दि.२८ एप्रिल २०२६ रोजीचे सकाळी ०५.०० वा. ते मतदान प्रक्रिया संपेपर्यंत अंमलात राहील.

**दिलेले आदेश :**

१) मतदानादिवशी मतदान केंद्रात तसेच मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात मतदान केंद्र अध्यक्ष, निवडणुक कामकाज संदर्भाने नेमलेले शासकीय व्यक्ती, कायदा व सुव्यवस्था बंदोबस्तासाठी नेमलेले शासकीय व्यक्ती ज्यांना निवडणुक संदर्भाने संपर्क करणे आवश्यक आहे यांचे व्यतिरिक्त इतर व्यक्तींना मोबाइल फोन, स्मार्ट फोन, वायरलेस किंवा संपर्क साधने वापरणेस सक्त मनाई आहे.

२) मतदान केंद्राचे २०० मीटर परिसरात तात्पुरते स्वरुपाचे पक्ष कार्यालय कोणत्याही धार्मिक, शैक्षणिक आस्थापनेत, रुग्णालयाजवळ किंवा अतिक्रमण करुन उभारणेस मनाई आहे.

३) सशस्त्र संरक्षण प्राप्त व्यक्तींना मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात सुरक्षा रक्षकासह प्रवेश करण्यास मनाई आहे. लोकप्रतिनीधीत्व अधिनियम, १९५१ कलम १३४ (ब) नुसार या कलमाव्दारे परवानगी दिलेल्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस मतदान केंद्रामध्ये किंवा त्या परिसरात शस्त्र घेवुन जाण्यास किंवा शस्त्र दाखवण्यास प्रतिबंध आहे.

४ ) मतदान केंद्राचे २०० मीटर आतमध्ये इलेक्शन बुथ लावता येणार नाही. एका इमारतीत एकापेक्षा जास्त मतदान बुथ असतील तरी देखील त्या इमारतीसाठी एका उमेदवाराला एकापेक्षा जास्त बुथ लावता येणार नाही.

५) मतदान दिवशी मतदान केंद्राचे २०० मीटर क्षेत्रामध्ये प्रचार करणेस मनाई आहे.

६) मतदान केंद्राचे २०० मिटर त्रिज्येमध्ये खाजगी वाहन आणण्यास मनाई आहे.

७) लाउड स्पीकर, मेगाफोन, आरडाओरडा करणे, गोंधळ करणे, दुवर्तन करणे, अशा प्रकारास मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मनाई आहे.

८) ज्या मतदारसंघात मतदान होणार आहे तेथे मतदार नसलेले राजकीय कार्यकर्ते वा प्रचार कार्यकर्ते त्यांना त्या मतदारसंघात थांबणेस मनाई आहे.

९) राजकीय प्रचार करण्याच्या उद्देशाने कोणतेही बल्कः मैसेज पाठविण्यास मनाई आहे.

१०) मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवणे, सार्वजनिक सभा, बैठता घेणे यास मनाई आहे.

११) मतदान दिवशी मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरामध्ये कोणत्याही प्रकारचे शस्त्र / हत्यारं बाळगणेस मनाई आहे.

## पुरंदर उपसा योजनेची पाईपलाईन दुरुस्त करा

### कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन

**माळशिरस :** सध्या उन्हाचा तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली असल्याने शेतीला पाणी देणे मुश्किल होत आहे पुंरदर तालुक्याला वरदान ठरणारी पुंरदर उपसा योजनेचे पाणी शेतकरी पैसे देऊन विकत घेत असतात व आपला विकतच्या पाण्यावरती चांगली शेती करून उदरनिर्वाह करण्याचा प्रयत्न करतात सध्या पुंरदर उपसा योजना सुरू असताना सर्वत्र मागणीनुसार पाणीपुरवठा होत आहे मात्र राजेवाडी तालुका पुंरदर येथील तक्रारवाडी येथील शेतकरी शेतीला पाणी मिळत नसल्याने मेटाकुटीला आला आहे सासवड ते सुपा भिगवण रस्त्याचे काँक्रीटी करणाचे काम सुरू असून या रस्त्याला पुंरदर उपशाच्या मायनर दोनचे लाईनचे क्रॉसिंग झाले आहे या रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम केल्याने पुंरदर उपसा योजनेची पाईपलाईन खराब झाल्याने शेतीला पाणी देणे मुश्किल झाल आहे, जनावरांना साऱ्याची सोयही करणे शेतकऱ्यांना अशक्य झाले आहे अनेक वेळा संबंधित कंपनीच्या ठेकेदाराला सूचना करूनही शेतकऱ्यांना दाद न दिल्याने शेवटी तक्रारवाडी येथील ग्रामस्थ, शेतकरी यांनी ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र शिंदे यांच्या बरोबर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट पुण्यात घेतली संबंधित शेतकऱ्यांनी आपापली कैफियत कृषिमंत्री पुढे मांडली कृषिमंत्री आणि शेतकऱ्यांची संपूर्ण ऐकून घेऊन संबंधित कंपनीचे ठेकेदार, एम एस आय डी सी चे कार्यकारी अभियंता तसेच पुंरदर उपसा जलसिंचन योजनेचे कार्यकारी अभियंता अशोक शेट्टी यांना शेतकऱ्यांच्या मागणीनुसार तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या कृषिमंत्र्यांच्या सांगण्यानुसार शेतकऱ्यांनी कार्यकारी अभियंता यांना निवेदन दिले.

## मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकास १० हजारांचा दंड

### पारगाव कारखाना पोलिसांची कारवाई:, वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांविरोधात पारगाव कारखाना पोलीस ठाण्याने कडक कारवाई करत एका वाहनचालकास १० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. या कारवाईमुळे बेशिस्त वाहनचालकांवर आळा बसण्यास मदत होणार असल्याचे पोलिसांनी सांगितलेपुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (खेड विभाग) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पारगाव पोलीस ठाणे हद्दीत अपघात प्रतिबंधासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक अंमलदार गणेश जोरी यांनी अपघातप्रवण ठिकाणांची ओळख पटवून कारवाई सुरू केली. २४ एप्रिल २०२६ रोजी रोडेवाडी फाटा येथे अष्टविनायक राज्य महामार्गावर वाहतूक तपासणीदरम्यान अमरजीत इंद्रपाल (रा. शिरूर, जि. पुणे) हा मद्यप्राशन करून चारचाकी वाहन चालवत असल्याचे निदर्शनास आले. त्याला ताब्यात घेऊन वैद्यकीय तपासणी करण्यात आली असता मद्यप्राशन केल्याचे निष्पन्न झाले. यानंतर त्याच्याविरुद्ध पारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस हवालदार देवानंद किर्वे यांनी तपास पूर्ण करून २८ एप्रिल २०२६ रोजी आरोपीस न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवत १० हजार रुपयांचा दंड ठोठावला. या कारवाईत पोलीस अंमलदार प्रशांत जगताप, वॉर्डन प्रमोद दिवेकर तसेच पोलीस मित्र रामभाऊ वाळुंज यांनी सहभाग घेतला. दरम्यान, पुढील काळातही अशा प्रकारच्या कारवाया सुरू राहणार असून वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन पारगाव कारखाना पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी केले आहे.

## वाईन्स शेजारी 'ओपन बार' वर कारवाई

### नागरिकांच्या तक्रारीनंतरएमआयडीसी रोडवर बारामती तालुका पोलिसांची कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** एमआयडीसी रोडवर वैभव वाईन्सच्या शेजारीच रस्त्याच्या कडेला सुरू असलेला 'ओपन बार'चा प्रकार अखेर पोलिसांच्या रडारवर आला आणि एका धडक कारवाईत संपूर्ण बेकायदा असणाऱ्यांनी घाव घालण्यात आला. वैभव वाईन्स यांना सुद्धा लेखी नोटीस देण्यात आली.

सायंकाळी ७ ते ९.३० या वेळेत पोलिसांनी पेट्रोलिंगदरम्यान ही कारवाई करत दणका दिला. संतोष शहा (गुड्डू पान शॉप) आणि अशोक लोंढे (मालिक टी टपरी) हे दोघे वैभव वाईन्समधून दारू घेऊन बाहेर पडणाऱ्या ग्राहकांना रस्त्याच्या कडेलाच ग्लास, पाणी व इतर साहित्य विकत देत होते. इतकंच नाही, तर त्याच ठिकाणी बसून मद्यपान करण्यास उघडपणे प्रोत्साहन देत 'ओपन बार'च उभा केला होता. यामुळे परिसरात मद्यपींची वर्दळ वाढून नागरिकांचा त्रास शिगेला पोहोचला होता. दरम्यान, अशिष वाल्मिकी हा 'अंडा भुर्जी' टपरी व नौशाद



मुलानी हा 'नूर चिकन सेंटर'मधून परवान्याविना व्यवसाय करत असल्याचेही उघड झाले. या सर्वांकडून कचरा थेट रस्त्यावर टाकून परिसर अस्वच्छ केला जात होता. नागरिकांच्या सततच्या तक्रारींची दखल घेत पोलिसांनी चौघांविरुद्ध मुंबई पोलीस कायदा कलम ३३ (डब्ल्यू) व ११५ अन्वये खटले दाखल केले.

कारवाईदरम्यान संबंधितांची वाहने व साहित्य जप्त करून पोलीस ठाण्यात आणण्यात आले असून प्रकरण न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.पोलिसांच्या या कारवाईनंतर एमआयडीसीतील बेकायदा धंदे करणाऱ्यांनी मोठा धसका घेतला असून पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव पोलीस उपनिरीक्षक अमोल कदम पोलीस अंमलदार भारत खारतोडे नितीन ढवण शशिकांत दळवी निलेश वाकळे हनुमंत पाटील दादा दराडे ओंकार भोसले संतोष कांबळे यांनी केली.

द•ख•ल

## प्रादेशिक क्रीडा संमेलन स्पर्धेत स्मॅश टेबल टेनिस ॲकॅडमीच्या खेळाडूंचे यश

**अहिल्यानगर** : केंद्रीय विद्यालय संघटन, मुंबई प्रदेशतर्फे ५५व्या प्रादेशिक टेबल टेनिस स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा २२ एप्रिल रोजी छऊऐ, खडकवासला, पुणे येथे पार पडल्या.

या स्पर्धेत स्मॅश टेबल टेनिस अकॅडमीच्या खेळाडूंनी उत्तम कामगिरी करत १ सुवर्ण, १ रजत आणि १ रौप्य पदके पटकावली. १७ वर्ष वयोगटात संघ प्रकारात वेदांत शितोळे आणि निधीश भंडारे यांच्या संघाने सुवर्ण पदक जिंकले. तसेच एकेरी मुलाच्या गटात वेदांत शितोळे याने रजत पदक व निधीश भंडारे याने कांस्य पदक जिंकले. सर्व विजयी खेळाडूंना मेडल व प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धेत अहिल्यानगर, मुंबई, पुणे, नागपूर, नांदेड, ठाणे आणि नाशिक या जिल्ह्यातील केंद्रीय विद्यालयातील खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेत हर्ष फुंदे याने उत्कृष्ट खेळ केला. स्मॅश अकॅडमीच्या सर्व खेळाडूंनी उत्तम कामगिरी करून प्रेक्षकांची मने जिंकली. या सर्व खेळाडूंचे टेबल टेनिसप्रेमींनी अभिनंदन केले.

## कला क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ.शिंदे यांचा भाळवणीत सत्कार



**भाळवणी** : कलाक्षेत्रातील योगदानाबद्दल पारनेर तालुक्यातील माळकुप सारख्या छोट्या खेडेगावातून उत्तुंग भरारी घेणाऱ्या डॉ. सुरेश शिंदे यांचा नगर पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आ. काशिनाथ दाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नाट्य व मराठी चित्रपट क्षेत्रात सुमारे पंधरा पुरस्कार प्राप्त मराठी चित्रपट व दहा लघुपट आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजले असताना माळकुप सारख्या खेडेगावातून शिक्षण घेऊन नगर येथे स्थायिक झालेल्या व भाळवणी येथे आपला डॉक्टरी पेशा सांभाळत कलेच्या माध्यमातून सातासमुद्रापार मराठी चित्रपटाचा झेंडा फडकवला. डॉ. सुरेश शिंदे यांनी नुकत्याच पार पडलेल्या लघु चित्रपट 'पत्रावळ ' यामध्ये मुख्य भूमिका पार पाडल्यामुळे संस्कृती कलादर्पण लक्षवेधी लघुपट पुरस्कार मिळाला. जेष्ठ अभिनेते डॉ. सुरेश शिंदे यांचे अनेक चित्रपटातील अभिनयाबद्दल राष्ट्रीय आंतराष्ट्रीय महोत्सवात गाजलेला भुमिकांची दखल घेऊन एकुनच कलेच्या प्रांतातील भरारीबद्दल आज आमदार काशिनाथ दाते यांनी अभिनयाच्या कारकिर्दीची दखल घेऊन डॉ. सुरेश शिंदे यांचा यथोचित सन्मान व सत्कार केला. त्यांचा 'निळावंती' जुलैमध्ये महाराष्ट्र भर प्रदर्शित होत असून सध्या एका हिंदी चित्रपटाचे चित्रीकरण सुरू आहे. यावेळी युवा नेते डॉ. प्रदीप दाते, पत्रकार संपत कपाळे, पत्रकार शिवशंकर शिंदे व संतोष तांबे उपस्थित होते. फोटो:- कलाक्षेत्रातील योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेते डॉ. सुरेश शिंदे यांचा सत्कार करताना आ. काशिनाथ दाते समवेत डॉ. प्रदिप दाते, पत्रकार संपत कपाळे, शिवशंकर शिंदे आदि. उपस्थित होते.

## काळेवस्ती शाळेत चौथीच्या विद्यार्थ्यांचा आगळावेगळा निरोप समारंभ



**शेवगाव** : शेवगाव तालुक्यातील वडुले बु. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळेवस्ती येथे इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना आगळावेगळ्या पद्धतीने निरोप देण्यात आला. विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणाचा वसा जपत शाळेला कुंडी व रोपटे भेट देऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या वेळी शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना पुस्तक भेट देऊन ज्ञानवृद्धीचा संकल्प जपण्याचा संदेश देण्यात आला. शिक्षणासोबतच पर्यावरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. कार्यक्रमात बोलताना ज्ञानेश्वर महाराज सबलस म्हणाले की, शिक्षकांचा मान ठेवला तरच जीवनातील ध्येय साध्य होऊ शकते. शिक्षक हेच विद्यार्थ्यांच्या यशाचे खरे शिल्पकार असतात. त्यांच्या या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमासाठी ज्ञानेश्वर महाराज सबलस, अमोल काळे, शरद काळे, शेषराव काळे, सुरेश दातीर सर, जगदीश डमाळे सर उपस्थित होते. उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## शिक्षकाने विद्यार्थ्यांना वाटली प्रोग्रेस किट

**अहिल्यानगर** : भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (छउएठढ) तसेच महाराष्ट्र शासनाच्या राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (डउएठढ),पुणे यांच्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (डटणत्र)अभियान,शांतीलाल मुथा फाऊंडेशनच्या मूल्यवर्धन उपक्रमांतर्गत येथील दोन राष्ट्रपती पदकांनी सन्मानित शिक्षक तथा जगातील सर्वाधिक पारितोषिके विजेते कलाकार डॉ.अमोल बागुल यांनी स्वखर्चातून विद्यार्थ्यांच्या विविध वार्षिक उपक्रमाअंतर्गत व्यक्तिमत्व विकास अभिलेखे जपणारी प्रोग्रेसिव्ह किट- पीके(झघ) विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते वितरित केली आहे. याप्रसंगी श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव सुरेश क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते.

# कर्जतने ओलांडला ४१ अंशांचा पारा

## सूर्य आग ओकतोय : नागरिकांसह पशुधन देखील कासावीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : कर्जतकरांनो सूर्य आग ओकत आहे. त्यामुळे आपली काळजी घ्यावी असे आवाहन करण्याची वेळ तालुका प्रशासनावर आली आहे. वाढत्या उन्हाच्या तडाख्याने उष्माघाताचे रुग्ण पहावयास मिळत असून सर्वसामान्य नागरिकांनी दुपारी १२ ते ३ या काळात शारीरिक थकवा येणारे किंवा अति कष्टाची कामे टाळणे उचित ठरत आहे. कर्जतमध्ये मंगळवारी ४१ अंश सेल्सिअस तापमानाचा पारा ओलांडला असून घामाची अंघोळ होत आहे. त्यात झाडाचे पान देखील हलत नसल्याने वातावरणातील कमालीचा दमटपणा जीवघेणा आणि असह्य ठरतोय.

यंदा मार्च महिन्यातच सूर्याने आपला करिष्मा दाखवायला सुरुवात केली. एप्रिल तर कहरच ठरला असून तापमानाने चाळीशी पार केली आहे. यात सर्वसामान्य नागरिकांसह पशुधन देखील कासावीस होत आहे.



या वाढत्या उकाड्याने आणि हवा नसल्याने सजीव सृष्टी निसर्गाच्या पुढे हतबल दिसत आहे. मंगळवारी कर्जत शहराच्या तापमानाने ४१ ओलांडली असून प्रशासनाकडून नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी केले आहे. कर्जतकरांनी शक्यतो सकाळच्या प्रहरीच आपली महत्वाचे कामे उरकून घ्यावी. सर्वसामान्य शेतकऱ्यांनी आपली शेतीची अति कष्टाची कामे करताना विशेष काळजी घ्यावी. वाढत्या उन्हाने राज्यात सर्वत्रच उष्माघाताचे रुग्ण आढळून येत आहे. त्यामुळे कामे करताना सैल कपडे, डोक्यास उपरणे किंवा टोपी यासह सावली निर्माण करणारे वस्त्र कायम सोबत बाळगावी. कडक उन्हात प्रवास करणे टाळावे. उन्हाच्या चटक्याने घामामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असून डी-हायड्रेशन सारखी समस्या उदभवल्यास थकवा, ग्लानी, डोळ्यास अंधारी येत चक्कर येण्याचे रुग्ण निदर्शनास येत असल्याने पिण्याच्या पाण्याचे प्रमाण या काळात वाढवावे असे आवाहन आरोग्य विभागाचे डॉ आरती भारती यांनी केले. घरात वातावरण हवेशीर राहील याकडे लक्ष देणे आवश्यक असून या काळात पांढरे किंवा सौम्य रंगाचे सैल कपडे वापरणे फायदेशीर ठरते. भडक रंगाने उष्णता शोषली जात शरीरास त्रासदायक ठरते. अजून मे महिना पूर्ण बाकी असून कुटुंबातील लहान मुलांसह जेष्ठ नागरिकांनी जिल्हा आणि तालुका प्रशासनाच्या सुचनेचे पालन करीत आपली दिनचर्या पार पाडावी.

### उष्माघाताची लक्षणे दिसल्यास तात्काळ वैद्यकीय उपचार घ्यावे : डॉ दयानंद पवार

सध्या कडक उन्ह बाधत असून या काळात जास्त करून उष्माघाताचे रुग्ण अधिक पहावयास मिळतात. चक्कर येणे, उलट्या-जुलाब होणे, तीव्र स्वरूपाची डोकेदुखी, दमछाक होणे या सारखे लक्षणे आढळतात. अशी लक्षणे आढळल्यास तात्काळ वैद्यकीय उपचार घेणे जीवनदायी ठरते. शरीरासाठी पचनास हलका आहार यासह भरपूर पाणी आवश्यक असून लिंबू सरबत, नारळाचे पाण्याचे सेवन लाभदायी ठरते. अति कष्टाची कामे या काळात टाळणे फायदेशीर ठरतात.

..............................

### स्लॅब पेक्षा पत्राच बरा म्हणायची वेळ

सध्या मानवी जीवन प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत असून पत्र्याची जागा सिमेंटच्या स्लॅबने घेतली. दिवसा पत्रा तापतो. मात्र संध्याकाळी तात्काळ गार देखील पडतो. स्लॅबच्या घरात उष्ण-दमट वातावरणाने गरम वाऱ्याच्या झळा कायम असह्य ठरत असून स्लॅब पेक्षा पत्राच बरा म्हणायची वेळ कुटुंबावर येत आहे.

# शेवगाव तहसीलमध्ये खरिप हंगाम पूर्व बैठक उत्साहात



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**हातगाव** : आ. मोनिकाताई राजळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार (दि २७) रोजी शेवगाव तहसील कार्यालय येथे खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक पार पडली. या आढावा बैठकी दरम्यान येणाऱ्या खरीप हंगामामध्ये उच्च दर्जाचे व गुणवत्तापूर्ण बी, बियाणे व खते मुबलक प्रमाणात उपलब्ध होईल याची दक्षता घेण्याबाबत उपस्थित कृषी विभागाचे अधिकारी यांना आ. राजळे यांनी सूचना दिल्या असून येणाऱ्या चालू खरीप हंगामामध्ये विविध मोहिमांची अंमलबजावणी करण्याबाबतही सविस्तर मार्गदर्शन केले. अशी माहिती तालुका कृषी अधिकारी अंकुश जोगदंड यांनी दिली आहे .

यावेळी आ .राजळे म्हणाल्या की ,शासन स्तरावर ज्या - ज्या योजना राबवल्या जात आहेत त्या सर्व मोहिमेमध्ये महिला शेतकऱ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी कृषी विभागातील सर्वच अधिकारी व कर्मचारी यांनी पुढाकार घेण्याबाबतच्या सूचना दिल्या. कारण सदर वर्ष हे आर्थिक आंतरराष्ट्रीय महिला वर्ष असल्याने महिलाना शेतकरी भगिनींचा विविध योजनेमध्ये तसेच विविध मोहिमेमध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदविण्याबाबत आव्हान केले. या वेळी तालुक्यातील प्रगतशील शेतकरी यांचा देखील आ. राजळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला आहे .तालुका कृषी अधिकारी अंकुश जोगदंड यांनी मागील आर्थिक वर्षामध्ये अंमलबजावणी केलेल्या विविध योजनांचा आढावा सांगितला . तसेच येणाऱ्या खरीप हंगाम २६/२७ मध्ये प्रस्तावित पीक पेरणी क्षेत्र व बी बियाणे मागणी, पुरवठा व उपलब्धता तसेच विविध मोहिमेंची अंमलबजावणीचे नियोजन व लक्षांक याबाबत सादरीकरण केले. तसेच येणाऱ्या खरीप हंगाम मध्ये अल निनो चा परिणाम जाणवणार असल्याने शेतकऱ्यांना कमी पाण्यावर येणारी पिके तसेच कमी कालावधी पिके घेण्यावर भर देणेबाबत कळविण्यात आले. या कार्यक्रमाला उपविभागीय कृषी अधिकारी, श्रीरामपूर कार्यालयातील तंत्र अधिकारी अमोल काळे, शेवगावचे प्रभारी तहसीलदार निलेश वाघमारे, तालुका कृषी अधिकारी अंकुश जोगदंड, तालुक्यातील सर्व मंडळ कृषी अधिकारी, तसेच कृषी विभागाचे सर्व क्षेत्रीय कर्मचारी अधिकारी कर्मचारी व पदाधिकारी उपस्थित होते.

# हिरडगावच्या विद्याताई बनकर यांना आदर्श सरपंच पुरस्कार; आ. पाचपुते यांच्याकडून गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या हिरडगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. विद्याताई रामदास बनकर यांच्या कार्याची दखल घेत त्यांना नुकताच आदर्श सरपंच पुरस्कार प्रदान करण्यात आला. या यशाबद्दल आ. विक्रमसिंह पाचपुते यांनी त्यांचा सत्कार करून विशेष कौतुक केले.

सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा हा प्रतिष्ठेचा पुरस्कार दि. ५ एप्रिल रोजी अहिल्यानगर येथील माऊली संकुल येथे आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. यावेळी आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील, सरपंच सेवा संघाचे संस्थापक बाबासाहेब पावसे तसेच हवामान तज्ञ पंजाबराव डंख यांच्या हस्ते सौ. बनकर यांना गौरविण्यात आले.

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध विकासकामे प्रभावीपणे राबवून गावाच्या प्रगतीस हातभार लावल्याबद्दल त्यांची निवड करण्यात आली होती.

या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा येथील माऊली निवासस्थानी आ. विक्रमसिंह पाचपुते यांनी सौ. विद्याताई बनकर यांचा फेटा बांधून, शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

यावेळी त्यांनी सरपंचांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी युवा नेते मिलिंद दरेकर, महेश दरेकर, मार्केट कमिटी सदस्य हौवसराव भोस, पंचायत समिती सदस्य, माजी सरपंच रामभाऊ गुणवरे, सुनील तात्या दरेकर, बाळासाहेब शिंदे, रामदास बनकर, सुभाष दरेकर (जिल्हाध्यक्ष, क्रांती सेना) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## अमरापूर येथे शेतात आढळले बिबट्याचे मृत पिल्लू; परिसरात घबराट



**शेवगाव** : अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील अमरापूर येथे आज दुपारी एक खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. गावातील माजी सरपंच विजय पोटफोडे यांच्या शेतात बिबट्याचे एक पिल्लू (बचडे) मृत अवस्थेत आढळून आले. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

आज दुपारी विजय पोटफोडे यांच्या शेतात काम सुरू असताना बिबट्याचे पिल्लू निपचित पडलेले दिसून आले. जवळ जाऊन पाहिले असता ते मृत असल्याचे स्पष्ट झाले. या घटनेची वाऱ्यासारखी बातमी गावात पसरताच ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने शेताकडे धाव घेतली. लोकवस्तीच्या जवळच बिबट्याचे पिल्लू आढळल्याने, परिसरात पूर्ण वाढ झालेला बिबट्या किंवा मादी बिबट्याचा वावर असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये आणि मजुरांमध्ये भीतीचे सावट आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. वनविभागाच्या पथकाने मृत पिल्लाचा ताबा घेऊन रितसर पंचनामा केला आहे. आम्ही घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला आहे. पिल्लाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, हे शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होईल. ग्रामस्थांनी घाबरून न जाता सतर्क राहावे, अशी माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. पिल्लाचा मृत्यू भूकेमुळे, आजारपणामुळे झाला की अन्य काही कारणाने, याचा शोध वनविभाग घेत आहे. तसेच, परिसरात मादी बिबट्या असण्याची शक्यता गृहीत धरून वनविभागाकडून गस्त वाढवण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## कॅनरा बँकेत ग्राहकांची गैरसोय; सुविधांबाबत खातेदारांत नाराजी

**अमरापूर** : शेवगाव येथील कॅनरा बँक शाखेत ग्राहकांना अपेक्षित सुविधा मिळत नसल्याची चर्चा खातेदारांमध्ये सुरू असून, विशेषतः वृद्ध नागरिक, महिला व सर्वसामान्य ग्राहकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे समोर आले आहे.




काही खातेदारांनी सांगितले की, करंट अकाउंट संदर्भातील माहिती व मोबाईल नंबरची आवश्यकता असताना संबंधित अधिकारी शुभम जैन यांनी आधारकार्डची झेरॉक्स मागितल्याने ग्राहकांचा वेळ गेला. नंतर आवश्यक माहिती दुसऱ्या कर्मचाऱ्यांकडून देण्यात आल्याने ग्राहकांनी नाराजी व्यक्त केली.

ग्राहकांच्या म्हणण्यानुसार, जर केवळ मोबाईल नंबर देऊन काम होणार असेल तर अनावश्यक कागदपत्रांची मागणी करून वेळ दवडू नये. बँकेत दूरवरून येणारे अनेक वृद्ध व महिला ग्राहक प्रतीक्षा करत असल्याचेही सांगण्यात आले.

दरम्यान, शाखेत अनेक दिवसांपासून एटीएम मशीन कार्यरत नसल्याने ग्राहकांना रोख रक्कम काढण्यासाठी अन्यत्र जावे लागत आहे. तसेच पासबुक प्रिंटिंग मशीनही वारंवार बंद असल्याने खातेदारांची गैरसोय वाढली आहे.

ग्राहक सेवेसाठी बँक कर्मचारी व अधिकारी नियुक्त असताना, ग्राहकांशी सौजन्यपूर्ण व तत्पर वर्तन होणे अपेक्षित असल्याची भावना खातेदारांनी व्यक्त केली. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या बाबींची दखल घेऊन सुविधा सुरळीत कराव्यात, अशी मागणी ग्राहकांकडून करण्यात येत आहे.

## निंभोरे पाटील परिवारातील ज्येष्ठांचा अनोखा अभिष्टचिंतन सोहळा

**लिंपणगाव** : निंभोरे पाटील परिवारातील ज्येष्ठ नागरिकांचा अभिष्टचिंतन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला.



मातृ-पितृ ऋणाची जाणीव ठेवत ६१ वर्षांनंतर अशा प्रकारचे सोहळे आयोजित करण्याची परंपरा जपली जात असून, या माध्यमातून ज्येष्ठांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा संदेश या कार्यक्मातून देण्यात आला. या सोहळ्यात सौ.कांताबाई व दादासाहेब निंभोरे, सुलोचनाबाई व आप्पासाहेब निंभोरे, सुमतिबाई व आदरसिंग निंभोरे, लताबाई व भास्करराव निंभोरे,आशाबाई व लालासाहेब निंभोरे, तसेच सिंधुबाई संभाजी राजेभोसले,ग.भा. हिराबाई सदाशिव जठार, द्वारकाबाई सर्जेराव मोरे,सौ. पुष्पाबाई चंद्रकांत गायकवाड आणि सौ.कमलबाई अंबादास राजेभोसले या परिवारातील ज्येष्ठांचा सन्मान करण्यात आला.

# डॉ. एकनाथराव ढाकणे यांना ग्रामसेवारत्न पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जन्मदिनानिमित्ताने शिर्डी येथे डेबूजी प्रतिष्ठाण महाराष्ट्र राज्य व कवी सरकार वाचनालय इंगळी कोल्हापूर यांच्या वतीने राष्ट्रसंत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलन पार पडले.

या संमेलनाच्या निमित्ताने राष्ट्रीउभारणीसाठी काम करणाऱ्या व गाडगेबाबा यांच्या आदर्श दशसूत्रीप्रमाणे काम करणाऱ्या व्यक्तींना या संमेलनात गौरविण्याचा मानस डेबूजी प्रतिष्ठाणने घेतला होता. त्याप्रमाणे प्रस्ताव न मागता प्रतिष्ठानने स्वतः शोधून व्यक्तींची निवड केली.

डॉ. एकनाथराव ढाकणे यांनी आपल्या संपूर्ण नोकरीच्या कालावधीमध्ये ग्रामविकास अधिकारी ते विस्तार अधिकारी या पदावर काम करतांना आपले



नोकरीचे गांव आदर्श केले. यात गाडगेबाबा यांना अभिप्रेत असलेले ग्रामस्वच्छता अभियान व इतरही शासकीय योजनांची उत्कृष्ट अंमलबजावणी केल्याने नोकरीच्या प्रत्येक ठिकाणच्या गावांना शासनाचे पुरस्कार मिळवून दिले. ग्रामसेवकांचे नेते म्हणून उछ्ए १३६ या ग्रामसेवक संघटनेच्या राज्याध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळताना शासनपातळीवर ग्रामसेवकांचे वर्षानुवर्ष रखडलेले ग्रामसेवकांचे प्रश्न शिताफीने सोडवले. प्रत्येक ग्रामसेवकांच्या सुखदुःखात ते कायम हजर असतात व मदत ही करतात. त्यांची ही आदर्श सेवा डेबूजी प्रतिष्ठाण व कवी सरकार इंगळी यांना भावली. म्हणून त्यांची ग्रामसेवारत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्याप्रमाणे शिर्डी येथे दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या राष्ट्रसंत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलनाच्या पुरस्कार वितरण समारोहात भारतीय धोबी महासंघाचे राष्ट्रीय वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. एकनाथराव बोरसे व संमेलनाध्यक्ष श्री. राजेंद्र फंड यांच्या हस्ते त्यांना ग्रामसेवारत्न पुरस्कार सन्मानाने प्रदान करण्यात आला. यावेळी आयोजक श्री. सुनील निकम, श्री.माधवराव देसाई, श्री. अनिल देसाई, श्री. विलासराव रोकडे, सौ. राजश्री फंड या उपस्थित होत्या.

# खाटीक गल्लीतील कत्तलखान्यावर पोलिसांची धाड; १७० किलो गोमांस जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : शेवगाव शहरातील खाटीक गल्ली परिसरात अवैधरित्या गोवंश जनावरांचे मांस विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर शेवगाव पोलिसांनी धाड टाकून १७० किलो गोमांस जप्त केले.

या कारवाईमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना २८ एप्रिल रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, खाटीक गल्ली येथील आय्याज उस्मान कुरेशी (वय ४२, रा. खाटीक गल्ली, शेवगाव) यांच्या घरामध्ये गोवंश जनावरांचे गोमांस विक्रीसाठी ठेवण्यात आले आहे. पोलीस निरीक्षक मुटकुळे यांनी तातडीने तपास पथकास सूचना देऊन दोन पंचांसह संबंधित ठिकाणी छापा टाकला.

छाप्यात घराच्या बाजूच्या मोकळ्या जागेत गोवंश जनावरांचे गोमांस आढळून आले. पोलिसांनी पंचनामा करून एकूण १७० किलो गोमांस ताब्यात घेतले. यासोबतच एक तराजू काटा, दोन धारदार चाकू आणि दोन लोखंडी मापेही जप्त करण्यात आली. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे ३५ हजार २०० रुपये असल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल राहुल आठरे यांच्या फिर्यादीवरून शेवगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३२५ तसेच महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ कलम ५ ए, ५ बी, ५ सी व ९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केमिकल तपासणीसाठी २०० ग्रॅम गोमांस नमुना सीलबंद करून ठेवण्यात आला असून उर्वरित मुद्देमाल पंचासमक्ष नष्ट करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस उपनिरीक्षक बाजीराव सानप, शाम गुंजाळ, भगवान सानप, राहुल आठरे, सचिन पिरगळ, ईश्वर बेरड, राजू बडे आदींच्या पथकाने केली. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल आजिनाथ खेडकर करीत आहेत.



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

बुधवार, दि.२९ एप्रिल २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## वॉर्ड नं. २ मध्ये येतोस कसा? म्हणत तरुणावर हल्ला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तू हिंदू आहेस, तू वॉर्ड नं. २ मध्ये कसा काय येतोस? असे म्हणत एका तरुणाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून लोखंडी फायटरने डोक्यात वार केल्याची घटना श्रीरामपूर शहरात घडली. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुपारी अडीचच्या सुमारास रुद्र याला त्याचा मित्र हमजा याने फोन करून वॉर्ड नं. २ मधील अँग्लो उर्दू शाळेजवळ बोलावले. त्यानुसार रुद्र तेथे गेला असता हमजा याच्यासोबत आणखी तीन अनोळखी तरुण उपस्थित होते. रुद्र त्यांच्या जवळ गेला असता हमजा याने तू हिंदू आहेस, तू वॉर्ड नं. २ मध्ये कसा काय येतोस? असा जाब विचारला. त्यावर रुद्र याने तूच मला फोन करून बोलावले, असे उत्तर दिल्याने आरोपी संतापले. त्यानंतर हमजा व त्याच्या साथीदारांनी रुद्र याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी हमजा याने हातातील लोखंडी फायटर रुद्रच्या डोक्यात मारून त्याला गंभीर जखमी केले. तसेच पुन्हा इकडे दिसलास तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देत आरोपी तेथून पसार झाले. जखमी रुद्र याच्यावर श्रीरामपूर येथील साखर कामगार रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी रुद्र यांच्या फिर्यादीवरून हमजासह अन्य तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

# हमारी मांगे पुरी करो.....

## कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा एल्गार; राज्यातील कृषी सेवा केंद्र बेमुदत बंद



कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी शासनाकडे विविध मागण्या साठी पुकारलेल्या बंदला कोल्हार भगवतीपुर परिसरात शंभर टक्के प्रतिसाद मिळाला.

गणेश कुंभकर्ण | राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार** : कंपन्यांकडून रासायनिक खताचा पुरवठा होताना होणारे लिंकिंग बंद करावे, शेजारील राज्यातून येणाऱ्या अप्रमानीत कापूस (क्धइढ) बियाण्यावर बंदी आणावी, प्रमाणित बियाण्यासंबंधीसाठी पोर्टलचा वापर विक्रेत्यावर सक्ती न करता उत्पादक व पुरवठादार कंपनी स्तरावरच राबवणे, रासायनिक खताचा पुरवठा (ऋजठ) पद्धतीने करावा, रासायनिक खताच्या विक्री मार्जिन मध्ये वाढ करावी, विक्रेते बियाणे पुरवठादार कंपन्याकडून सीलबंद पॅकिंग मध्ये खरेदी करून शेतकऱ्यांना त्याच पॅकिंगमध्ये विक्री करत असल्यामुळे तपासणीमध्ये नमुना फेल झाल्यास विक्रेत्यास आरोपी न करता साक्षीदार मानण्यात यावे.

मुदत बाह्य कीटकनाशके पुरवठादार कंपन्यांनी विक्रेत्यांकडून परत घ्यावी. केंद्र शासनाच्या कृषी विभागाकडून नवीन बियाणे कायदा २०२५ मधील विक्रेत्यांसाठी जाचक नियम शिथिल करावेत या मागण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी सोमवार दि. २७ एप्रिल पासून बेमुदत कृषी सेवा विक्री केंद्र बंद आंदोलन पुकारले. या आंदोलनात कोल्हार भगवती पूर व परिसरात कृषी सेवा केंद्राचे विक्रेते सहभागी झाले त्यामुळे कृषी सेवा केंद्र बंद आंदोलनाला कोल्हार भगवतीपुर परिसरात १००% यश मिळाले. राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या कृषी निविष्ठा विक्री व्यवसायातील प्रलंबित अडचणी संदर्भात राज्याच्या कृषी विभागाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नसल्यामुळे कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी दि. २१ एप्रिल रोजी महाराष्ट्र फर्टीलायझर डीलर असोसिएशनचे उपाध्यक्ष विवेक कासार अहिल्यानगर जिल्ह्याचे फर्टीलायझर असोसिएशनचे अध्यक्ष हराळ व राहता तालुका कृषी असोसिएशनचे अध्यक्ष व जिल्हा फर्टीलायझर असोसिएशन संचालक व कोल्हार येथील सामाजिक कार्यकर्ते कैलास रावसाहेब वर्पे यांनी जिल्हा व तालुका स्तरावरील कृषी अधिकारी तहसीलदार पीआय यांना आपल्या स्वाक्षरीनीशी निवेदन दिले होते.

संघटनेचे सर्व पदाधिकारी राज्याचे कृषिमंत्री, प्रधान सचिव, कृषी विभाग राज्याचे आयुक्त, कृषी विभाग व राज्याचे संचालक निविष्ठा व गुणवत्ता नियंत्रक विभाग यांच्याकडे गेली चार-पाच वर्षापासून या मागण्यांचा पाठपुरावा केला. परंतु राज्याच्या कृषी विभागाकडून विक्रेत्यांना अडचणी सोडवण्याबाबत कोणतेही ठोस कारवाई झालेली नाही त्यामुळे त्यामुळे कृषी सेवा केंद्र बेमुदत बंदचे हत्यार कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी उचलून हमारी मांगे पुरी करो असा एल्गार करीत बंद सुरूच ठेवला आहे. आज बंदचा दुसरा दिवस होता. यामुळे कोल्हार भगवतीपुर परिसरातील शेतकऱ्यांची रासायनिक खते व इतर कीटकनाशके न मिळाल्यामुळे मोठी अडचण झाली. या आंदोलनाबाबत शेतकरी वर्गात चिंतेचा सूर उमटत आहे.

## गोमांस विक्री करणाऱ्या दोघांच्या मुसक्या आवळल्या, १५५ किलो गोमांस हस्तगत



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : येथील नाईकवाडी कुरेशी मोहल्ल्यात नेवासा पोलिसांनी मंगळवारी दि.२८ रोजी सकाळी छापा टाकून गोमांस विक्री करणाऱ्या दोघांच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्या घरातून १५५ किलो वजनाचे गोमांस हस्तगत केले आहे. मंगळवारी दिनांक २८ एप्रिल रोजी पोलीस ठाण्यात नव्याने दाखल झाले पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की नेवासा खुर्द येथील नाईकवाडी कुरेशी मोहल्यात गोमांस विक्री होत असल्याची माहिती मिळाली. सदरची खात्रीलायक माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी तात्काळ पोलीस स्टाफ यांना सदर माहितीचा थोडक्यात आशय सांगून रवाना केले असता सदर पोलीस स्टाफ व पंच असे नाईकवाडी कुरेशी मोहल्ला नेवासा खुर्द या ठिकाणी गेले असता तेथे अरबाज अबू चौधरी हा इसम गोमांस तोडून विक्री करत असल्याचे खात्री होताच सकाळी ८.३० वाजता छापा टाकून त्यास जागीच पकडले.

पोलिसांनी त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव अरबाज अबू चौधरी वय २९ वर्षे राहणार नाईकवाडी मोहल्ला नेवासा खुर्द असे सांगून तो बसलेल्या ठिकाणची पंचासमक्ष झडती घेतली असता तेथे गोमांस मिळून आले ते पंचासमक्ष जप्त करीत असताना पुन्हा माहिती मिळाली की शेजारी राहत असलेला आयाज शेख याच्या राहत्या घरात वरच्या मजल्यावर देखील गोमांस विक्री चालू आहे अशी माहिती मिळाली त्या ठिकाणी सुद्धा पोलीस पथक पाठवून खात्री केली असता तेथे आवेज आयाज शेख हा गोमांस विक्री करताना मिळून आला त्यास जागीच पकडून ताब्यात घेतले. सदर ठिकाणी जप्ती पंचनामा करून एकूण १५५ किलो अंदाजे ४६ हजार ५०० रुपये किमतीचे तसेच एक इलेक्ट्रिक वजन काटा एक हजार रुपये किमतीचा,तसेच ५०० रुपये किमतीचा वजन काटा व सत्तुर जुना वापरता असा एकूण ४८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. सदर आरोपींविरुद्ध नेवासा पोलीस ठाणे येथे प्रचलित कायद्यान्वये पोलीस कॉन्स्टेबल श्रीनाथ नवनाथ गवळी नेवासा पोलीस स्टेशन यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरचे कामगिरी ही अहिल्यानगर जिल्हयाचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे,श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाकचौरे,शेवगाव विभागाचे डीवायएसपी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शना खाली नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर सोमनाथ ढिकले,पोलीस हवालदार अजय साठे, पोलीस कॉन्स्टेबल श्रीनाथ गवळी, नारायण डमाळे, राम वैद्य, गणेश जाधव, सुमित करंजकर यांनी केली आहे. नेवासा पोलिसांनी गोमांस विक्री करणाऱ्यावर कारवाई केली मात्र ही कारवाई तात्पुरती मलमपट्टी ठरू नये,गोहत्या करणाऱ्या या नराधमांना कडक शासन करण्यात येऊन येथील कत्तलखाने उध्वस्त करून माऊलींच्या या नगरीतून कत्तलखाने हद्दपार करावे अशी मागणी नेवासकर नागरिकांसह गोरक्षकांनी केली आहे.

## मुळा उजव्या कालव्याचे ४० दिवसांचे आवर्तन आजपासून

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : महाराष्ट्रात प्रचंड उष्णतेची लाट उसळली असून अनेक भागांत तापमान ४२ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. वाढत्या उन्हामुळे जलसाठे झपाट्याने कमी होत असून विहिरी, तलाव आणि ओढे आटण्याच्या स्थितीत आले आहेत. रब्बी हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात पिके वाचवण्याचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहे. त्यामुळे गावागावातील शेतकऱ्यांचे लक्ष आवर्तन कधी सुटणार याकडे लागले होते. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन मुळा लाभक्षेत्रातील मुळा उजव्या कालव्यावरील शेतकऱ्यांची पाण्याची मागणी आणि वाढती उन्हाची तीव्रता विचारात घेता उन्हाळी हंगामासाठी २९ एप्रिल २०२६ पासून आवर्तन सुरू करण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुळा पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या असल्याची माहिती आमदार विठ्ठलराव लंघे यांनी दिली.

> रब्बीचा शेवट आणि खरिपाच्या मशागतीच्या तोंडावर आज नेवासा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर पीक विम्याचे पैसे जमा झाले त्यातच आवर्तन सुटण्याची सुखद बातमी मिळाल्यानंतर नेवासा तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये आनंद व्यक्त होत आहे

सध्या लाभक्षेत्रात पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात घटल्याने शेतीसाठी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी आवर्तन सोडण्याची मागणी वाढली होती. यासंदर्भात आमदार विठ्ठलराव लंघे यांनी मंत्री विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा करून उन्हाळी आवर्तन सुरू करण्याची विनंती केली होती.

या आवर्तनाचा लाभ राहुरी, नेवासा, शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यातील मुळा उजव्या कालव्याच्या लाभक्षेत्राला होणार आहे. हे आवर्तन ४० दिवसांचे राहणार असून त्यासाठी ४.८ टीएमसी पाणीसाठा राखीव ठेवण्यात आला आहे. अंदाजे ३० हजार हेक्टर क्षेत्राला या पाण्याचा फायदा होणार आहे. शेतकऱ्यांच्या मागणीचे गांभीर्य ओळखून मंत्री विखे पाटील यांनी तातडीने निर्णय घेत आवर्तन सुरू करण्याचे आदेश दिल्याने लाभक्षेत्रातील शेतकरी व नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.आवर्तनाच्या कालावधीत पाण्याचा अपव्यय होणार नाही, शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचेल आणि योग्य नियोजन केले जाईल, याबाबत अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश देण्यात आल्याचेही आमदार लंघे यांनी सांगितले. उन्हाळ्याच्या तोंडावर सुटणाऱ्या या आवर्तनामुळे पिकांना जीवनदान मिळणार असून गावपातळीवरील नागरिकांच्या तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात मार्गी लागणार आहे.

## श्रीरामपुरात पोलीस उपविभागास मिळाली
### अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हिलन्स व्हॅन




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर पोलीस उपविभागासाठी अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हिलन्स (फॉरेन्सिक) व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपकरणांमुळे श्रीरामपूर उपविभागातील गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यास आणि पुरावे गोळा करण्यास पोलिसांना मोठी मदत होणार असल्याची माहिती श्रीरामपूर उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांनी दिली.

अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या पुढाकाराने अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हिलन्स (फॉरेन्सिक) व्हॅन उपलब्ध करण्यात आलू असून या व्हॅनचे उद्घाटन अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी करत यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख व पोलिस अधिकारी उपस्थित होते. याबाबत अधिक माहिती देताना पोलीस उपअधीक्षक जयदत्त भवर म्हणाले या व्हॅनमध्ये थेट सीसीटीव्ही फुटेज पाहण्यासाठी आणि विश्लेषणासाठी मोठी स्क्रीन उपयुक्त राहणार आहे. गर्दीच्या ठिकाणी किंवा उंचावरून देखरेख ठेवण्यासाठी व्हॅनमध्येच वॉच टॉवरची सुविधा आहे. लाठी, हेल्मेट, हेडलाईट आणि टेचर अशी सुरक्षा साधने ठेवण्याची व्यवस्था आहे.

वैद्यकीय मदत म्हणून आपत्कालीन स्थितीसाठी व्हॅनमध्ये 'फर्स्ट एड बॉक्स' उपलब्ध. आधुनिक तंत्रज्ञानामुळे गुन्ह्यांचा तपास अधिक पारदर्शक होईल. तांत्रिक पुराव्यांमुळे गुन्हेगारांचा शोध कमीत कमी वेळेत घेता येईल. श्रीरामपूर शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सीसीटीव्ही व्हॅन प्रभावी ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## घोड धरणावरून साकळाई योजना हवीच
### पण मूळ लाभधारकांवर अन्याय नको : खा. निलेश लंके

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : घोड धरणावर आधारित साकळाई उपसा सिंचन योजना झालीच पाहिजे, मात्र मूळ घोड लाभधारक शेतकऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये, अशी ठाम भूमिका खासदार निलेश लंके यांनी मांडली. श्रीगोंदा शहरातील 'हॉटेल ए स्टार' येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. अहिल्यानगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांनी श्रीगोंदा शहरातील हॉटेलचे स्टार या ठिकाणी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते.

या वेळी जेष्ठ नेते बाबासाहेब भोस,संजय लाकुडझोडे, हरिदास शिर्के यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.त्यावेळी लंके म्हणाले, साकळाई योजना राबवली तर मोठ्या प्रमाणात क्षेत्र सिंचनाखाली येईल. शेतीला बळ मिळेल, विकासाला गती येईल. त्यामुळे या योजनेला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. पण त्याच वेळी त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, घोड लाभक्षेत्रातील जुन्याचा हक्क बाजूला ठेवून विकासाचा गाजावाजा करायचा असेल, तर तो विकास नव्हे; तो अन्यायाचा नवा अध्याय ठरेल.

दरम्यान, साकळाई योजनेसाठी आग्रही असलेल्या पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या भूमिकेशी लंके यांचा सूर जुळल्याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. राजकारणात सूर जुळले की ताल बदलतो, अशी कुजबुजही बैठकीबाहेर ऐकू येत होती.एकंदरीत, साकळाई योजनेला गती देताना मूळ लाभधारकांचे हक्क अबाधित ठेवणे हेच आता प्रशासन आणि लोकप्रतिनिधीं समोरचे खरे 'लिटमस टेस्ट' ठरणार आहे.त्यावेळी राजकीय अंगाने बोलताना लंके यांनी थेट इशाराच दिलाकोणीही सत्तेचा अमरपट्टा घेऊन आलेला नाही.

२०२९ ला पुन्हा निवडणुका आहेतच, त्यावेळी आम्ही ताकतीनिशी मैदानात उतरण्याची तयारी आत्तापासून सुरू केली आहे.त्यामुळे विरोधकांनी पराभव स्वीकारायला शिकले पाहिजे. असं सल्लाही त्यांनी बोलताना दिला आहे.

> **खासदार पत्रकारांवर चिडले ?**
>
> मतदार संघात विकास कामाबद्दल नाराजी व्यक्त करत पत्रकारांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यानंतर निलेश लंके यांनी तालुक्यातील पत्रकारांवरती चिडत त्यांच्या प्रयत्नांना बगल देत उत्तर देण्याचे टाळले असल्यामुळे त्यावर प्रश्न चिन्ह निर्माण केले जात आहे.

## देशात लोकशाही गुंडाळून भोंदूशाही आणली जात आहे : ॲड. कारभारी गवळी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : समाजात धर्माच्या नावाखाली निर्माण होणाऱ्या भावनिक वातावरणाचा गैरफायदा घेत सर्वसामान्यांना दिशाभूल केली जात असल्याचा आरोप करत, या प्रवृत्तीविरोधात जनजागृती करण्यासाठी पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने 'नॉन जेनेटिक इनफॉरमेशन' या संकल्पनेवर आधारित अभियान सुरू करण्यात आले आहे. तर देशात लोकशाही गुंडाळून भोंदूशाही आणली जात असल्याचा आरोप करून, छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान सहन केला जाणार नसल्याचा इशारा ड. कारभारी गवळी यांनी दिला आहे.

या अभियानाच्या माध्यमातून धर्म आणि अंधश्रद्धा यांमधील स्पष्ट फरक नागरिकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. समजा, तपासा आणि सुधार करा! ही घोषणा देत नागरिकांनी कोणतीही गोष्ट आंधळेपणाने स्वीकारण्याऐवजी तिचा विचारपूर्वक अभ्यास करावा, असा संदेश देण्यात आला आहे. ॲड. गवळी यांनी सांगितले की, देशाची वाटचाल वैज्ञानिक दृष्टिकोनाऐवजी अंधश्रद्धा आणि भावनिकतेकडे होत असल्याची चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. विज्ञानाधारित विचारसरणी रुजवण्यासाठी आणि समाजात विवेक जागृत करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. इतिहासाच्या संदर्भातही त्यांनी चिंता व्यक्त केली. इतिहासाचे विकृतीकरण होत असून, अनेक ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचे कार्य राजकीय सोयीप्रमाणे वेगळ्या पद्धतीने मांडले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे सर्वसामान्य जनतेच्या सहभागातून उभे राहिले होते, याची जाणीव समाजाला करून देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. भावनिक कथा आणि संदेशांची सातत्याने पुनरावृत्ती केल्याने लोक प्रश्न विचारणे थांबवतात आणि कालांतराने असत्य गोष्टीही सत्य म्हणून स्वीकारल्या जातात. पार्श्वभूमीवर, लोकशाही व्यवस्थेत विचारपूर्वक मतदानाचे महत्त्व अधोरेखित केले. जेव्हा निर्णय विचाराऐवजी भावनेवर घेतले जातात, तेव्हा लोकशाही कमकुवत होते.

## आले... पाहिले... अन्... शुभमंगल सावधान !
### घारगावात अवघ्या चार तासात विवाह सोहळा संपन्न

दादा सोनवने | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : लग्न म्हटलं की गडबड, गोंधळ, रुसवे-फुगवे आणि खर्चाचा फुगवटा हा सगळा पॅकेज डिफॉल्ट असतो. पण घारगावात पानसरे आणि कदम परिवाराने हा साचा अक्षरशः मोडीत काढत अवघ्या चार तासांत साध्या, सुटसुटीत आणि तरीही उत्साही वातावरणात विवाह सोहळा पार पाडत एक नवा 'ट्रेंड' सेट केला.

तालुक्यातील घारगाव येथील महाराष्ट्र राज्य पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे यांची पुतणी, रामदास सखाराम पानसरे यांची कन्या श्वेता हिचा आणि पिंपळगाव पिसा येथील कदम परिवारातील सुभाष कदम यांचे चिरंजीव मंगेश यांचा विवाह रविवारी



(दि. २६ एप्रिल) पार पडला.

विशेष म्हणजे, याच दिवशी सकाळी मुलगा-मुलगी पाहण्याचा कार्यक्रम झाला दुपारपर्यंत पसंती, सुपारी आणि साखरपुडा उरकला आणि सायंकाळी ७ वाजता थेट मंगलाष्टक! म्हणजे मीटिंग झाली, डील फायनल, आणि इम्प्लिमेंटेशन ऑन द स्पॉट- कॉर्पोरेट भाषेत सांगायचं तर 'सिंगल-डे क्लोजर'! या वेळी संतोष खोमणे यांनी अचानक विवाहाचा प्रस्ताव मांडला. दोन्ही कुटुंबांनी क्षणाचाही विलंब न लावता होकार दिला आणि काही तासांतच विवाह सोहळा थाटात संपन्न झाला. या अनोख्या विवाह सोहळ्याचे पंचक्रोशीतून कौतुक होत असून मोठ्या संख्येने ग्रामस्थ, पाहुणे आणि मान्यवर उपस्थित होते. यामध्ये विक्रमसिंह पाचपुते, राहुल जगताप, प्रणोती जगताप, दिनकर पंदरकर, हेमंत नलगे, पुरुषोत्तम लगड, ह.भ.प. भास्कर महाराज कदम, मयूर पंदरकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून वधू-वरांना आशीर्वाद दिले. कार्यक्रमाचे स्वागत लालासाहेब पानसरे यांनी केले.

**चांगल्या गोष्टीची सुरुवात घरातूनच - दत्तात्रय पानसरे**

समाजात आपण आर्थिकदृष्ट्या सक्षम असलो, तरी दिखाऊपणाला फाटा देत साधेपणाने विवाह करणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे. तीन-चार तासांत पार पडलेला हा सोहळा इतरांसाठी आदर्श ठरेल. पुढेही अशाच पद्धतीने विवाह व्हावेत, अशी भावना दत्तात्रय पानसरे यांनी व्यक्त केली.

**साधे विवाह हीच काळाची गरज - आ. विक्रम पाचपुते**

आजचं युग वेगाचं आहे. वेळ आणि पैसा दोन्ही महत्त्वाचे. पारंपरिक विवाहांमध्ये दोन्हींचा मोठा अपव्यय होत होता. घारगावातील या उपक्रमाने नवा आदर्श निर्माण केला आहे. भविष्यात गावोगावी असेच विवाह व्हायला हवेत, असे प्रतिपादन विक्रमसिंह पाचपुते यांनी केले.

## मुरुमाचे पैसे न मिळाल्याने ठेकेदाराने भोकर ग्रामपंचायतीला ठोकले टाळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील भोकर ग्रामपंचायतीचा भोंगळ कारभार समोर आला आहे. ग्रामपंचायतीसाठी मुरूम टाकून चार महिने होवून ही ठेकेदाराला ग्रामपंचायतकडून पैसे न मिळाल्याने या ठेकेदाराने चक्क ग्रामपंचायत कार्यालयास टाळे ठोकले. तसेच टाळे ठोकतांनाचा व्हिडीओ व निवेदन सोशल मिडीयावर व्हायरल करत सत्ताधाऱ्यांना घरचा आहेर दिला आहे. यापूर्वीचे ग्रामविकास अधिकारी विकास कामास साथ देत नसल्याचे दाखवून येथे नविन ग्रामविकास अधिकारी रूजू झाले. मात्र, ग्रामपंचायतच्या कारभारात अपेक्षीत सुधारणा झाली नाही. यापूर्वी डिसेंबर २०२५ मध्ये येथील आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी केलेल्या कामाचे पैसे आत्ताच्या आत्ता द्या, आत्ता चेक द्या असे सुनावत अरेरावी केल्याने हा वाद थेट तालुका पोलिसांत गेला होता. यावर गटविकास अधिकारी यांनी गणेश दुधाळे यांची माळवाडगाव येथे बदली करून भोकर गावचा कारभार खोकरचे हितेश ढुमणे यांना सोपविण्याचा आदेश काढला. त्यात दुमणे यांनी मार्च अखेर होवू द्या, मी एप्रिलमध्ये चार्ज घेतो असे सांगून वादाच्या धास्तीने ढूमणे यांनी गावाला एप्रिल फुल केले. दि. ६ मार्च रोजी येथील जेसीबी चालकाने दोन वर्षापासून जेसीबीच्या कामाचे थकलेले पैसे दिले नाही. म्हणून चक्क ग्रामपंचायत कार्यालयातच अधिकारी व पदाधिकारी यांच्या समोर विष प्राशन केले होते.